# डाक्क्याची फत्ते छंबच्या रणांगणावर

सत्तेचाळीस सालातील सत्तेचाळीस दिवस
बर्मा फ्रंट
या दोन गाजलेल्या लेखमालेचे लेखक
कर्नल जाधव
यांनी
वेगळ्या दृष्टिकोनातून
चितारलेली छंब आघाडी.

२२ जानेवारी १९७२
पन्नास पैसे

# माणूस

प्रजासत्ताक दिन अंकाचे एक आकर्षण

**शिवाय..............................**




## शिवाय....

" असित, तुम्ही कलकत्ता हे एक दुःस्वप्न मानू शकता, मी नाही, माझ्या शरीरावर पडलेले हे ओरखडे ! असे ओरखडे कधी स्वप्नांत पडू शकतात का असित? शिवाय आपल्याला पुन्हा कलकत्त्यातच यावे लागणार, कलकत्ता सोडून जाणार तरी कुठे ? कोणत्या समाजात ? तुम्ही एकटे साऱ्या सुखसोयी उपभोगत पडाल आणि समाज तुमच्या सुखसोयींचं रक्षण करील, असा समाज कुठं अस्तित्वात आहे का ? आजच्या युगात तुम्हाला काही घ्यायचं असेल तर काही तरी द्यावच लागेल. एवढी साधी गोष्ट समजायला उशीर झाला तर आपल्यापाशी काहीच शिल्लक राहणार नाही, असित, काऽऽही रहाणार नाही. . . . "

# रसातळाला जाण्यापूर्वी...

धकाधकीच्या जगात आपल्यावर आलेल्या विचित्र प्रसंगामुळे अन्तःकरणात तळापासून हाललेली, स्वतःला, पतीला व समाजालाहि भेदक प्रश्नांनी जाब विचारणारी लिली !

गौरीशंकर घोष यांच्या मूळ बंगाली कथेचा अस्वस्थ करणारा अनुवाद.



| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २२ जानेवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | चौतीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार...

### बांगलाचे निर्वासित आणि शहाद्याचे आदिवासी

¤ दि. ९ डिसेंबरला बंगाल सोडला व लगेच १ जानेवारीस शहादा येथे आलो. बंगलात असताना वाटत होते,निर्वासितांची भयंकर दैन्यावस्था आहे. पण जेव्हा बंगाल सोडून शहाद्याला आलो, तेव्हा एका दुःखाच्या डोंगरावरून दुसऱ्या दुःखाच्या सागरात येऊन पडल्याचे अनुभवास येत आहे.

शहाद्याच्या 'ग्राम स्वराज्य समिती' ऑफिसमध्ये मुक्काम होता. अनेक गावाहून अनेक आदिवासी तिथे तक्रारी नोंदवायला येत असत व अनेकांच्या अनेक तक्रारी ऐकत होतो.

आठ दिवसांपूर्वी आमच्या एका सर्वोदयी मित्राने 'माणूस' अंकात 'निक्षर गावचा आदिवासी' या शीर्षकाखाली लेख दिला, त्यात त्यांनी एका आदिवासी बांधवांच्या मुलाखतीचं वर्णन केलं. कार्यकर्ता : 'देशात फार विकास झाला, असे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

पुढारी आपल्या भाषणांतून सांगत असतात, त्याचा फायदा नाही का मिळाला ?

आदिवासी : ' विकास '! साहेब तो सावकाराचा मुलगा, शहरात राहातो, तो कशाला भेटेल आम्हासनी ?'

या त्याच्या संवादात्मक लेखातून व तिथे येत असलेल्या तक्रारींमधून मी जे समजायचे ते समजलो व मनात एकच तळमळ निर्माण झाली, शहादा सोडून खेड्यात केव्हा जाईन व केव्हा या सर्व दु:खितांची भेट घेईन.

एकदाचे काल आमलाड शिवारात पाय टकले. लोक आमच्या भोवती गोळा झाले. व आपल्या तक्रारी सांगू लागले, एक ना दोन अनेक तक्रारी ऐकत होतो. किती ऐकाव्या व किती ध्यानात ठेवाव्या ?

गुजर जमीनदार पैशाच्या भरवशावर सरकारी नोकराला आपल्या कह्यात ठेवून, पीक संरक्षण संस्थेचे चौकीदार असे सारेच एकत्र येऊन आदिवासींचा छळ करीत आहेत व इथे संघर्ष सुरू आहे, हा संघर्ष केवळ वर्गसंघर्ष आहे, गरीव-विरूद्ध श्रीमंत असा हा संघर्ष आहे.

मी त्या लोकांच्या भेटी घेतल्या व जे ऐकले त्यातील एक प्रकरण वाचकांच्या समोर ठेवीत आहे.

नवगावचा एक आदिवासी ' हिरा गोबा भिल्ल, ' त्याने सरकारकडून कर्ज काढलं व त्याची केव्हाच फेडही झालेली. साऱ्या पावत्या त्याच्याकडे आहेत. तरी मागल्या-वर्षी त्याची जमीन लिलावात काढण्यासाठी मामलेदारांनी नोटीस दिली. प्रकरण कम्युनिस्ट पुढाऱ्याच्या लक्षात आलं. त्यांनी कलेक्टरांना भेटून ' स्टे ' आणला व त्या प्रकरणात स्वत: कलेक्टरनेही जातीने लक्ष घातलं. गेल्या वर्षी त्या बिचाऱ्याची जमीन बचावली. पण या वर्षी काय ? १३ डिसेंबरला लिलाव झाला उभ्या पिका-सह. ज्वारीचं पिक डोलत आहे. नाही म्हटलं तरी दीड-दोन हजार रुपयांची ज्वारी तिथे होईल. पण ६ एकर जमीनीचा अवघ्या ४,८०० रुपयांत उभ्या पिकासह लिलाव झाला व ४ मैल लांब असलेल्या एका गावच्या जमीन मालकांनी ते खरेदी केलं.

८ जानेवारी १९७२ **मोरेश्वर वडलकोंडावार**, अमलाड (शहादे)

□ १ जानेवारीच्या माणूसमध्ये प्रा. रा. म. बापट यांचे पत्र वाचले. श्री. बर्वे–पायगुडे यांना लोकशाही न्याय मिळवून देण्याच्या बाबतीत आपण सर्वांनी जी उदासीनता दाखविली याचा विषाद त्यांच्याप्रमाणेच अनेकांना वाटत असेल. नागरिकांना घटनेनुसार मिळणारे मूलभूत अधिकार व संरक्षण नाकारले गेले तर ती आपल्या लोकशाहीची आत्मघातकी चूक ठरेल हे त्यांचे मत कोणाही लोकशाही-वाद्यास मान्य होईल.

नागरिकनिष्ठा कायद्याने मोजून भागत नाही. नागरिक कायद्याविरुद्ध जात

नाहीत. पण राज्याबद्दल, देशाबद्दल आपुलकी नाही, प्रेम नाही तर काय उपयोग? कायद्याच्या चौकटीत बसून राष्ट्रद्रोह करणारांना कडक शिक्षा व्हावयास हव्यात. राष्ट्राच्या संकटातसुद्धा कित्येकजण सणच साजरा करीत असतात. अनेकजण प्राप्ती-कर चुकवितात. त्यासाठी लपविलेला पैसा बाहेर काढायला हवा. व्यापारी हिशे-बाच्या वह्याही बदलतात. तेच लोक आज उघड माथ्याने फिरत असतात. अगदी खेड्यातही असा पैसा फार आहे.

तसेच ग्रामीण भागात मोठमोठे बागायतदार छोट्या शेतकऱ्यांना नेहमीच त्रास देतात. मोठ्या बागायतदारांची थोडी शेती पाणीपट्टी भरून व बाकीची पाणीपट्टी-शिवाय भिजवता येते. एकाच पाळीस दोनदा-तीनदा पिके भिजवतात. तर छोट्या शेतकऱ्यास – वेळेवर पाणीपट्टी भरणारा असला तरीही – प्रत्येकवेळी पाणी मिळ-तेच असे नाही. हा त्रास नीरा उजवा कॅनॉल, माळशिरस भागात नेहमीच होतो. याविरूद्ध फारच तक्रारी झाल्यास तेवढ्यापुरती दखल घेतली जाते. चौकशी करावयास येणारे अधिकारी बड्या बागायतदारांकडे चौकशीस जातात. कारण तेच लोक त्यांच्या सल्लागार-मंडळात असतात. त्यांच्याकडून अधिकाऱ्यांना काय खरी वस्तुस्थिती कळणार? फोंडशिरस गावात यंदा ज्वारीच्या पिकांना पाणी मिळण्यास असाच उशीर झाला. उच्चपदाधिकाऱ्यांकडे तक्रारी गेल्यावरच पाणी वाटप व्यवस्थित होऊ शकेल. दोन वर्षांपूर्वी पाणीवाटपाचे पास देण्यात आले. त्यासाठी काय कसोटचा लावल्या गेल्या, कोणास प्राधान्य देण्यात आले हे Open Secret आहे.

तेथील लोक इच्छा असूनही याविरूद्ध आवाज उठवू शकत नाहीत. तेथील जन-तेत विरोधवृत्ती, निर्भयता निर्माण झाली पाहिजे. निर्भयवृत्ती हीच स्वातंत्र्याचा आत्मा व आधार आहे. ती निर्माण व्हावी यासाठी काही भाव, विचारप्रणाली समाजात दृढ व्हावयास हवी. उदासीनता जाऊन दक्ष व जाणीवेने काम करणारा नागरिकवर्ग तयार झाला पाहिजे. हे कार्य कोणत्याही राजकीय पक्षाकडून होणे शक्य नाही. प्रा. बापट व आपल्यासारख्या विचारवंतांनी मार्गदर्शन करून युवक संघटनांकडून हे करणे शक्य आहे. असा प्रयत्न व्हावा अशी विनंती आहे.

१५ जानेवारी, १९७२ मोरेश्वर दाते. सोलापूर

मुक्काम शहादे

# गरिबांच्या जमिनी कशा जातात ?

आमलाड गावच्या हिरालाल शिवदास भिल्ल याला वकिलामार्फत एका सावकाराने नोटीस दिलेली आहे. नोटिसींत म्हटले आहे, की 'तुमचे वडील मयत झाले आहेत. तुम्ही त्यांचे वडील मुलगे व तुमच्या एकत्र कुटुंबातील मॅनेजर आहात. तुम्ही तुमच्या वडिलांचा सर्व कारभार पाहता. तुमच्या वडिलांनी तुमची जमीन मला विक्रीस देण्याचे कबूल केले होते. त्या पोटी सहा हजार रुपये त्यांनी घेतले होते. तुमची जमीन नव्या शर्तीची आहे. ती जुन्या शर्तीची करून आम्हास विक्रीस द्यावी. तसे तुम्ही केले नाही तर वेळोवेळी तुमच्या वडिलांनी घेतलेले रुपये १२,४१४/– ही नोटीस मिळेल तेथपासून एक महिन्याच्या आत आणून द्यावे. नाहीतर तुमच्यावर कायदेशीर इलाज केला जाईल.' हा तरुण भिल्ल अंबरसिंग महाराजांकडे आला. सोबत त्याची आईही आली होती. चिंतेत होती दोघं. भिल्ल फारच भित्रे. मालकापुढे वर मान करणार नाहीत. तो म्हणेल ते ऐकतील. वास्तविक त्याला घाबरण्यासारखे काहीच नव्हते. कारण जमिनीवर त्याचाच कब्जा होता. पैसेही त्याने घेतले नव्हते. वडिलांनी घेतले की नाहीत याची त्याला कल्पना नव्हती. त्याची आई म्हणत होती, माझ्या समक्ष कधीच पैसे दिलेले नाहीत. सावकार लोकांचा जमीन बळकावण्याचा हा एक प्रकार आहे. तू नाही तुझ्या बापाने. बरं हे लोक पैसे कर्जाऊ का देतात ? कायद्याप्रमाणे पैसे कर्जाऊ देण्याचे त्यांनी लायसन्स काढले आहे का ? नाही. गरिबांना फसवण्याचा, नाडण्याचा, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा हा एक अनधिकृत मार्ग सावकार लोक चोखाळीत आहेत.

शहादे–तळोदे भागांतील जमिनी या अशा गेल्या आहेत. गरीब आदिवासींकडच्या जमिनी जाऊ नयेत म्हणून त्या नव्या शर्तीच्या करून त्यांना देण्यात आल्या होत्या. इंग्रज सरकारनेच ही व्यवस्था केली होती. परंतु स्वराज्यामध्ये या नव्या शर्तीच्या जमिनी जुन्या शर्तीच्या करण्याची मुभा मिळाली. त्यामुळे आदिवासी जमीन गमावून बसले. आर्थिक अडचणीमुळे गांजलेला गरीब भिल्ल नेहमीच पैशाच्या लालचीला बळी पडतो. हा त्यांचा कमकुवतपणा जाणून अनेक धूर्त लोकांनी त्यांची जमीन बळकावली. प्रथम पैशाची लालूच दाखवायची. त्याप्रमाणे पैसे द्यायचे. डोळा

ठेवायचा जमिनीवर. आता पैसे परत आले नाहीत तर तुझी जमीन दे. तू पैसे परत दिलेस, की मी जमीन परत देईन असे सांगायचे. त्यासाठी करार करून घ्यायचे. कोऱ्या कागदावर आंगठे घ्यायचे. पैसे द्यायचे दोनशे. लिहायचे दोन हजार. जमीन वहिवाटीला आल्यानंतर हळूच 'कूळ' म्हणून आपल्या नावे नोंदवून घ्यायची. त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना पैसे द्यायचे. पुढे हळूच ती जमीन पैसे भरून जुन्या शर्तीची करून घ्यायची. कुळ असल्यामुळे ती विक्रीत घ्यायची कलेक्टरची परवानगी मिळवायची व एक दिवस खरेदीखत करून घ्यायचे. आपल्या जमिनी कायमच्या गेल्या याची गरीब आदिवासींना दादच लागत नसे. यात जसे जमीन लुबाडणारे सावकार गुन्हेगार आहेत तसे सरकारी अधिकारीही गुन्हेगार आहेत. वास्तविक आदिवासींची जमीन अन्य कुणी घेऊ नये अशी अपेक्षा. सरकारची तशी इच्छा. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी ती फलद्रूप होऊ दिली नाही. यामुळे आज इकडचा भिल्ल समाज भूमिहीन बनून गेला आहे.

भिल्ल समाजाच्या जमिनी कशा गेल्या हे पाहण्याचे काम सध्या सर्वोदयी कार्यकर्ते करत आहेत. चाळीस गावांचा सर्व्हे पुरा होत आला आहे. त्यामध्ये ३२ गावच्या २४० लोकांच्या जमिनी गेलेल्या आहेत.

१ : सरकारच्या रेकॉर्डला कब्जेदार म्हणून आदिवासीचे नाव आहे. वहिवाटदार म्हणून तोच आहे. परंतु प्रत्यक्ष जमीन त्याच्याकडे नाही.

२ : अडचणीच्या वेळेला पैशासाठी आदिवासींनी जमीन काही पैसे घेऊन सावकाराला २ ते १० वर्षांच्या कराराने दिली आहे. करार संपला परंतु जमीन आदिवासीला परत मिळू शकलेली नाही.

३ : आदिवासींनी लँड-मॉर्गेज-बँकेचे कर्ज काढले किंवा सरकारकडून तगाई घेतली ती परत करू शकले नाहीत. ती परत करायला सावकाराला सांगितले. त्यापोटी जमीन काही वर्षांकरता सावकाराला दिली. ती त्यांच्याकडेच आहे.

४ : शेजारची जमीन आदिवासींची आहे. ती सावकाराला सोयीची आहे म्हणून सावकाराने त्याच्याकडून ती जमीन घेतली व त्याच्या मोबदल्यात दुसरी जमीन द्यायचे कबूल केले. त्याप्रमाणे करार झाला. सावकाराला त्याच्या लगतची जमीन मिळाली परंतु भिल्लाला दुसरी बदली जमीन कब्जात मिळू शकली नाही.

पहिल्या दोन प्रकारची जमीन ही आदिवासींना लगेच परत मिळू शकते. पुढच्या दोन प्रकारची जमीनही लगेच परत मिळू शकेल. त्यासाठी संघटित प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष दिले तर बरेचसे काम पुरे होईल. लोकांनीही आता संघटित होऊन आपली जमीन परत मिळवली पाहिजे. या दोन गोष्टी होण्याची आवश्यकता आहे. या भागात सर्वोदय कार्यकर्ते या दृष्टीने प्रयत्नाला लागले आहेत. शिरूड व अक्कडकोट या दोन गावच्या लोकांनी संघटित होऊन आपल्या जमिनी परत मिळवल्या. गावागावात जाऊन ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत व ज्यांच्याकडे जमिनी गेल्या आहेत त्यांच्याशी बोलून जमिनी

परत मिळवून देण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. आदिवासींची जेवढी संघटित शक्ती या कामाला लागेल तेवढे या कामाला यश अधिक येईल. शहादे व तळोदे या दोन तालुक्यांत मिळून अशा गरिबांची जमीन सर्व मिळून दहा हजार एकर तरी गेली असावी असा अंदाज आहे.

## दोन रुपये मजुरी हवी

संघटित प्रयत्नांमुळे जमीन आदिवासींना मिळायला काही प्रमाणात सुरुवात झाली असली, तरी सर्वांना जमीन मिळेल अशी स्थिती नाही. बेकार लोक खूप आहेत. ते सर्व शेतमजूर आहेत. शेतीच्या हंगामात त्यांना मजुरी फारच कमी मिळते. आठ आण्यापासून दोन रुपयांपर्यंत मजुरी आहे. ही मजुरीही वाढली पाहिजे. सबंध महाराष्ट्रातच शेतमजुरीची परिस्थिती कठीण आहे. या भागात ती विशेष आहे. कारण येथली जमीन अत्यंत सुपीक आहे. तीन पिके निघतात. जमीनदारांनी ट्रॅक्टर आदी आधुनिक साधने वापरून शेतीवरील मजुरीची कामे कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतमजुराला आज काहीच आधार नाही. येथील शेतमजूर एक दिवस नाही तर सहा दिवस रिकामे असतात. सालदार म्हणून अकरा महिने काम करणारे लोक पहाटे पाचपासून रात्री दहापर्यंत आपल्या मालकाकडे राबतात. याचा काही विचार व्हायला हवा.

शहरातील मजूर संघटित होऊन आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात. त्याला पगारी हक्काची रजा असते. आठवड्यातून एक दिवस त्याला सुट्टी असते. बाईला बाळंतपणाची पगारी रजा मिळू शकते. शहरातील कामगारांना बोनस मिळतो. यातले याला काहीच मिळत नाही. अत्यंत दैनावस्थेत आजचा शेतमजूर जगत आहे. फार दिवस ही दैन्यावस्था ते सहन करू शकणार नाहीत. सरकारने नुकतेच शेतमजुरीचे दर काय असावेत यासाठी एक समिती नेमली आहे. ती केव्हा विचार करील तेव्हा करील. परंतु गावातील लोकांनी एकत्र येऊन, संघटित होऊन आपली मजुरी वाढवून घेतली पाहिजे. किमान दोन रुपये मजुरी मिळाल्याशिवाय आम्ही कामच करणार नाही अशी भूमिका घेतल्याशिवाय आपली मजुरी वाढणार नाही. सालदार म्हणून जो काम करतो त्याला किमान एक हजार रुपये वर्षाला मिळाले पाहिजेत. एक महिन्याची त्याला पगारी सुट्टीही मिळाली पाहिजे. मागेल त्याला काम ही गरिबी हटावची महाराष्ट्र सरकारची घोषणा आहे. परंतु या भागातील लोक म्हणतात, आम्हाला काम द्या, जमीन द्या, आम्हाला माणुसकीने वागवा. हे सांगण्यासाठी प्रचंड मोर्चा व मेळावा ३० जानेवारीला रविवारी शहादे येथे संघटित केला जाणार आहे. येथील भूमिहीनांच्या समस्या, त्यांच्या अडचणी प्रश्न कसे सोडवावेत हे सांगण्यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांना निमंत्रण पाठवण्यात आले

आहे. त्यांनी यावे. आजच्या परिस्थितीत या शेतमजुरांचे, गरिबांचे प्रश्न कसे सोडवावेत, सरकार त्यांना काम कसे देऊ शकेल, त्यांची मजुरी कशी वाढेल, त्यांना माणूसकीची वागणूक कशी मिळेल हे सर्व समजावून सांगावे व ते अमलात येण्यासाठी काही जबाबदारी उचलावी, यासाठी सर्व पक्षांना निमंत्रण देण्यात आले आहे. मेळाव्यासाठी गावोगावचे लोक पायी चालत येतील. आपल्या मागण्यांचे बोर्ड घेऊन ते गावागावांतून निघतील व शहादे येथील तहसील कचेरीत जातील. आपल्या मागण्यांचे निवेदन देतील व त्यानंतर जाहीर सभेमध्ये त्याचे रूपांतर होईल. आलेले पाहुणे व नेते मेळाव्यात भाषण करतील. अंबरसिंग व त्यांचे सहकारी हा मेळावा संघटित करण्याच्या कामात गुंतले आहेत. या मेळाव्याच्या प्रचारासाठी नुकतीच मोड या गावी सभा झाली. सभेला आसपासच्या गावचे दोन हजार लोक जमले होते. सभेमध्ये श्री. दामोदरदास मुंदडा, गोविंदराव शिंदे, अंबरसिंग यांची भाषणे झाली. जमिनीचे प्रश्न कसे सोडवता येतील, मजुरी कशी वाढवून मिळू शकेल व आदिवासी समाजामध्ये ज्या अनिष्ट प्रवृत्ती आहेत त्या कशा घालवता येतील यासंबंधी सभेमध्ये मार्गदर्शन झाले. अशाच सभा ठिकठिकाणी घेतल्या जात आहेत. वातावरण बनत आहे. मेळावा संघटित करण्याची तयारी चालू आहे. तेव्हा या भागातील सर्व भूमिहीन शेतमजूर व गरीब किसान बंधुभगिनींनी या मेळाव्याला हजर राहणे जरुरीचे आहे.

संयोजक

**सातपुडा सर्वोदय मंडळ, धडगाव**
**ग्रामस्वराज्य समिती, शहादे**
**भिल्ल आदिवासी सेवामंडळ, शहादे**
**महाराष्ट्र भूमिहीन, शेतमजूर,**
**गरीब शेतकरी परिषद, धुळे**
**माणूस प्रतिष्ठान, पुणे**

---

# भूमुक्ति मेळावा, शहादे

## रविवार, ३० जानेवारी १९७२

## मोठ्या संख्येने मिरवणुकीने मेळाव्याला सर्वांनी यावे

---




# आता एल.आय.सी.च आपले स्वप्न साकार करील

स्वतःचं घर अथवा फ्लॅट असावा असं सर्वांनाच वाटतं. ते केवळ 'वाटणं' आता एल्. आय्. सी. च्या घरबांधणी योजनेमुळे प्रत्यक्षात उतरवणं शक्य आहे. घरबांधणीसाठी एल्. आय्. सी. आपल्या पॉलीसीजवर माफक दरानं कर्ज देते. त्याची परतफेड देखील सोयीस्कर छोटया हप्त्यांनी करता येते.

ह्या योजनेखालील भारतातील सर्व मोठ्या व कांही छोट्या शहरांतील विमेदारांना फायदा घेता येईल. अधिक माहितीसाठी जवळच्या एल्. आय. सी. च्या शाखाधिकाऱ्यांना भेटा.

*आयुर्विम्याला पर्याय नाही!*

PRATIBHA 1511-16-MAR

अरुण गोसावी



# जत्रा

जय जय इंदिरा समर्थ
मोहन महाराजकी जय
तुळशीदाऽऽस-शंकराऽऽव

इंदिरा माऊली, आयेऽऽऽ तार गऽऽ बयो. यंदा टिकट मिळालं तर मतदार संघातून एक लाख एक रुपये संरक्षण निधीला जमवून नवस फेडीन—

गेल्या आठवडयात तुम्ही मुंबईत नरीमन पॉईंटला सहज भटकायला गेला असतात तर वरीलप्रमाणे उद्घोष आणि नामसंकीर्तन कानी पडले असते. सकाळी-संध्याकाळी तिथे फिरायला जाणाऱ्या म्हाताऱ्या पारशी जोडप्यांची संख्या रोडावली आहे. संध्याकाळी प्रेमी युगुलांची ही खास जागा. पण तेही आता हा भाग टाळू लागले आहेत. जरड कातडीच्या चिंतातूर चेहऱ्यांच्या, खादीचे डगले घातलेल्या मंडळींनी तेथील आसमंत दुथडी वहात आहे. पांढऱ्या टोप्यांची संख्या कमी झाली आहे. गर्भ-श्रीमंतीचे नवे लक्षण समजल्या जाणाऱ्या खादी सिल्कची चलती तिथे दिसेल. कोपऱ्यावरच्या 'रिव्हेरा'मध्ये श्री. यशवंतराव चव्हाण राहातात आणि महाराष्ट्र कॉंग्रेसतर्फे येत्या निवडणुकीसाठी तिकीटरूपी महाप्रसाद वाटपाचे यज्ञकर्म तिथे चालू आहे. म्हणून ही जत्रा आणि हे नामसंकीर्तन.

ते पहा—ते पहा. दोन खादी डगवाले तुमच्याच दिशेने येताहेत. तोंडात पान आहे, चेहऱ्यावर ओशाळ हसू आहे. एकाच्या काखेत एक भली जाडी फाईल आहे. तो इच्छुक उमेदवार असावा. तुम्ही समोर दिसताच दुरून त्यांचे हात विनम्रपणे जोडले गेले आहेत. मान तुकली आहे. घाबरू नका. तुम्ही त्यांना ओळखत नसलात तरी ते तुम्हाला ओळखतात.

'ह्यँ: ह्यँ: ह्यँ: — काय सायेब. वळख इसरलात ?'

'छे: छे ! तुमची ओळख कसा विसरेन ? इकडे कुणीकडे ?'

'आँ. म्हंजे तुम्हास म्हाईतच नाही जनू. अहो तिकिटाला आलो.'

'मग जमलं का ?'

'तर ! अहो आपल्याशिवाय आहे कोण मतदारसंघात काम करायला. मी चक्क सांगितलं इलेक्शन बोर्डाला, हे बघा, मागचं मिडटर्मचं ठीक होतं. आता असेंब्ली आहे. बाईंच्या नुसत्या नावावर भागणार नाही. माझ्यासारखा वाघच हवा फाईटला. मंडळी एकदम गार.'

'किती जणांनी आर्ज केलेयत तुमच्या जागेसाठी ?'

"असतील वीसेक. पण खरा मीच. अहो जुना सेवक आहे काँग्रेसचा.'

"बराय येतोय.'

"सायेब, आपली मोहनरावांशी ओळख आहे. जरा शब्द टाका ना गरीबासाठी. बघा साहेब. नम्रसेवक आहे मी जनतेचा. कार्य केलं आहे. तेवढा शब्द टाकाच–

पावलो पावली तुम्हाला अशी सभाषणे ऐकायला मिळतील. सचिवालयाच्या आमदार निवासात ही गर्दी. त्यापेक्षा धर्मशाळा बरी. आत पाऊल ठेवायला जागा नाही. एक विरोधी पक्षाचे आमदार म्हणाले, 'अहो खोली मिळायची मारामार. किल्ली मिळते. पण दार उघडलं की पेटी-बिस्तऱ्यांची रांग. चालायचंच. सत्ताधारी पक्ष आहे. आमची तक्रार नाही.' आमदार निवासाच्या आसपास जीप्स आणि इतर गाड्यांचा नुसता वेढा. काँग्रेस सत्ताधारी पक्ष आहे हे ताबडतोब पटते.

काही इच्छुक उमेदवारांची व्याकुळता कीव येण्यासारखी असते. जो दिसेल त्याला मुजरा. एरवी उपमंत्र्याला कोणी पुसत नाही. पण आता 'रिव्हेरा'वर किंवा आमदार निवासावर कोणी उपमंत्री आला की मुजऱ्यावर मुजरे झडतात. आणि तोही अशा रुबाबात चालतो की जणू इंदिराबाईंनी नावे भरून पाठवायला कोरे कागदच आपल्या हाती दिले आहेत. मंत्र्यांच्या पाया पडणे वगैरे काही विचारू नका. काही इच्छुक उमेदवार तर काही वजनदार वार्ताहरांच्याच गळी पडून शब्द टाकायला सांगतात.

शब्द कुणाकडे टाकायचा ? प्रदेशाध्यक्ष वसंतदादा पाटील यांच्याकडे ? छे ! मुख्यमंत्री नाईकांकडे ? मुळीच नाही. महाराष्ट्र काँग्रेसचे श्रेष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्याकडे ? तोबा तोबा, भलतीच आफत. शब्द टाकायचा असतो इंदिरा गांधींकडे, उमाशंकर दीक्षितांकडे. शंकरराव चव्हाणांकडे, मोहन धारियांकडे, तुळशीदास जाधवांकडे किंवा बाबासाहेब सावनेकर वा बापूराव देशमुखांकडे. बरीचशी नावे महाराष्ट्र काँग्रेसच्या राजकारणात नवी आहेत. पण त्याला इलाज नाही. पाच महिन्यांपूर्वी तुळशीदास जाधवांना कुणी विचारीत नव्हते. समोरून दिसले, की मंडळी कोपरा काटायची. आज त्यांना कोण भाव !

महाराष्ट्र काँग्रेसमधले बहुतेक लोक मोहन धारियांवर जळफळणारे. त्यांची टिंगल-टवाळी करणारे. पण प्रदेश काँग्रेस कमिटीची सभा संपली तेव्हा त्यांचा रुबाब बघायला हवा होता. सभा संपल्यावर वसंतराव नाईक कसे गेले कुणाला कळले

नाही, वसंतदादा पाटलांकडेही कुणाचे फारसे लक्ष गेले नाही. पण मोहन धारियां-भोवती इच्छुकांचा हा गराडा ! साहेब, आमचा अर्ज बघा जरा. साहेब, तेवढं बघा जरा—वगैरे—

आणि शंकरराव चव्हाणांच्या गोटाचा रुबाब तर विचारू नका. विजयी मुद्रेने मंडळी हिंडताना दिसतात. जणू शंकरराव आता झालेच मुख्यमंत्री. शंकररावांच्या उमेदवारांना प्रधानमंत्र्यांचा पाठिंबा असल्याचा फोन आल्याची हाकाटी उठली आणि काय ड्रामा झाला म्हणता. तेव्हापासून शंकररावांच्या बंगल्यावरची आणि ऑफिसातील वर्दळ एकदम वाढली. पूर्वी शंकररावांकडे कुणी फारसे फिरकत नसे. ऑफीसमध्ये चिठी पाठवली की पटकन बेल वाजवून बोलवून घेत. आता त्यांच्या ऑफीसभोवती असा प्रचंड गराडा असतो ! त्या गराड्यातून प्यून शोधून काढायलाच दम लागतो.

यशवंतराव चव्हाण—नाईक गटाचे चेहरे मात्र पडले आहेत. संसदीय मंडळ उमेदवार निवडीचे कामकाज यशवंतरावांच्याच घरी चालवते म्हणून त्यांच्या घरा-वर गर्दी. बाकी चव्हाण आता ओसरू लागल्याचीच भावना सर्वत्र आहे. प्रदेश काँग्रेसच्या सभेला तर यशवंतराव आलेच नाहीत. नाईक आणि त्यांच्या पाठीराख्यांचे चेहरे चिंतातुर दिसतात. पण अद्याप जोम आहे. 'अहो बघा, आपल्यासारखंच होणार आहे. जरा दम धरा—' असे ते सांगत असतात. शंकररावांच्या गोटातले लोक नुसते हसतात, 'बघाल, बघाल.'

इकडे वसंतरावदादा पाटील यांनीही सांगली जिल्ह्यातून निवडणूक लढविण्याचे ठरविल्याचे सांगतात. दादा काही साधे आमदार म्हणून सभागृहात बसणार नाहीत. ज्युनियर मिनिस्टरचीही जागा ते खपवून घेणार नाहीत. मग ते कशासाठी निवड-णूक लढविताहेत ? दादांचाही एक मोठा पाठीराखा गट आहे. नाईक—चव्हाण आणि शंकरराव या वादात दादांनी कोणतीच भूमिका घेतली नाही अशी प्रशस्ती खुद्द शंकररावांनीच दिलेली आहे. दादांची भूमिका नेमकी काय आहे हे अद्याप कुणालाच नीट कळलेले नाही. ऐनवेळी कदाचित ते स्वतःच मुख्यमंत्रीपदासाठी उभे राहतीलही. कुणी सांगावे. ते महत्वाकांक्षी आहेत.

हा सर्व गोंधळ संपविण्याची जादूची कांडी आहे श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हाती. इंदिराबाई जो उमेदवार सांगतील तोच मुख्यमंत्री होणार हे पक्के. 'आपल्या-सारखंच होणार' असे सांगणारे नाईकांचे पाठीराखे म्हणतात, की बाई नाईकांच्या विरुद्ध आहेत ही उगाचच हूल आहे. काही सांगतात, निवडणुकीनंतर एक वर्ष नाईक मुख्यमंत्रीपदी राहतील आणि नंतर निवृत्त होतील अशी योजना आहे.

गालातल्या गालात हसणारे शंकररावांचे पाठीराखे म्हणतात, बाई स्पष्ट काहीच बोलल्या नाहीत. त्यामुळे ते लोक त्यांना सोयीस्कर असा अर्थ लावतात. आमच्याशी मात्र बाई स्पष्ट बोलल्या, असे ते आडवळणाने सांगतात आणि काय स्पष्ट बोलल्या


असे विचारले तर पुन्हा गालातल्या गालात हसतात आणि नुसतेच डोळे मिचकावतात.

आपला कल शंकररावांकडे आहे असे जरी इंदिराबाईंनी दर्शविले असले तरी मुख्यमंत्रीपदाचा विचार निवडणुकीनंतरच करायचा असे सांगून त्यांनी हाती मोठेच अस्त्र ठेवले आहे. इंदिराबाईंना महाराष्ट्रात चव्हाणांचा भाव खाली आणून दुसरे पर्यायी नेतृत्व उभे करायचे होते. आतापर्यंत त्यांना जमत नव्हते. अनेक माणसे त्यांनी हाताशी धरली. पण ती कच्च्या पायाची निघाली. आता त्यांना शंकररावां-सारखा भक्कम पाय रोवून उभा राहणारा माणूस मिळाला आहे. ही संधी श्रीमती इंदिरा गांधी सहजासहजी सोडणार नाहीत. अर्थात ऐनवेळी त्या कोणते आश्चर्य पुढे आणतील हे आत्ताच सांगण्याचा प्रयत्न कोणी करू नये.

दरम्यान इंदिरा नामाचा गजर 'रिव्हेरा'वर जोरात चालू राहील. इथे जरी कितीही उमेदवारांची यादी तयार झाली तरी अखेरचे शिक्कामोर्तब होणार दिल्लीला. यापुढे आपली नावे यादीत नसणार अशी ज्यांची खात्री आहे ते आधी-पासूनच दिल्लीला मोर्चे बांधण्यासाठी तयारी करू लागले आहेत. येत्या काही दिवसांत वेस्टर्न रेल्वेवर आणि इंडियन एअरलाईन्सवर जोरात ताण पडणार हे नक्की.

□ □ □


# थोडे थोडे साठविता धन पुष्कळ होते गाठी
# महाराष्ट्र बँकेची
# कुपन डिपॉझिट योजना




*तुम्हाला खर्च करता करता बचत*
*कशी करायची त्याची युक्ति सांगेल*

आपण माल खरेदी केल्यावर पैसे देता...दुकानदार योग्य ती किंमत घेऊन उरलेले सुटे पैसे परत देतो...ही किरकोळ मोड परत घेण्याऐवजी महाराष्ट्र बँकेची कूपन्स मागा...ती ५० पैशांची किंवा एक रुपयाची असतात... तुम्हांला जी कुपन्स डिपॉझीट पत्रिका देण्यात येईल तीवर ही कुपन्स चिकटवा.

कूपन्सची एकुण किंमत रु. ५०/- झाली की, निश्चित मुदतीच्या ठेवीमध्ये त्याचे रुपांतर करा — तुमच्या नकळत अगदी सोप्या पद्धतीने विशेष प्रयत्न न करता तुमची बचत होऊ शकेल बचत करा व निश्चित मुदतीच्या ठेवींच्या योजनेचा पूर्ण लाभ घ्या. –

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफीसः ११७७ बुधवार पेठ, पुणे-२

ही योजना पुणे शहरापुरतीच मर्यादीत आहे

# सामीये शरणमैय्यप्पा !

"ग्यानबा तुकाराम ! ग्यानबा तुकाराम " वारकरी चिपळयांच्या तालावर ठेका धरीत आहेत. पाठीवर पडशा आणि खांद्याला पताका. धुळीने अंग चांगलेच माखलेले. गाव सोडताच चार दिसांनीच वहाणांनी सोबत सोडून दिली. पण आता ध्यास एकच ! पालखीच्या मागे मागे चालायचं. मधल्यागावी रात्रीचा मुक्काम अन् दुसऱ्या सकाळी चालायला सुरुवात. 'ग्यानबा ! तुकाराम' अन् विठूनामाचा गजर. जिथे नांदला ज्ञानराजा सुपात्र, अशा पवित्र अलकापूरहून निघायचे. लक्ष फक्त मोठ्या एकादशीवर. नेत्र लागले चद्रभागेच्या वाळवंटी मधल्या गावोगावी पालखीचे स्वागत होते. तीवर फुले, लाह्या, बत्तासे उधळले जाताहेत. पण वारकरी फक्त डोळे मिटून 'ग्यानबा तुकाराम' म्हणत पालखीमागे जात आहेत. गावातल्या मोठ्या चौकात पालखी दर्शनासाठी थांबली. वारकऱ्यांनी एका थांवल्या जागीच फेर धरला...टाळमृदुंगाचा गजर वाढला...हाताबरोबरच पायांनाही वेग आला.. दुतर्फा उभ्या बायकापोरांनीही टाळयांचा ठेका धरला... तेवढयात पालखी पुढे निघून गेल्याचं कुणाच्याही ध्यानात आलं नाही.

तेलिचेरीस वास्तविक असंच व्हायचं त्या दिवशी...त्या दिवशी म्हणजे २८ डिसेंबर १९७१ च्या रात्री...तेलिचेरी शहर केरळ राज्यातील 'कोहळीकोड' जिल्ह्यात आहे. इंग्रजांनी जसे मुंबईचे बॉम्बे बनवले तसेच कोहळीकोडला कालिकत बनविले...त्या दिवशी वरीलप्रमाणेच वारकऱ्यांची मिरवणूक किंवा दिंडी निघाली होती...सारं काही पंढरीच्या दिंडीप्रमाणच, फक्त गजर होता "सामीयै शरण-मैय्याप्पा ! स्सामीयै शर्णमैय्याप्पा !"...हो आणखीही एक किरकोळ फरक घडला म्हणा...वास्तविक इतका शुल्लक, की त्याचा उल्लेख देखील करायला नको... पालखीवरती फुले उधळली जात होतीच, त्यातच "कुणीतरी" भारतीय नागरिकाचे (अर्थातच् 'चुकून'!) पालखीवर चपला फेकल्या !

'तेलिचेरी' नाव कानावर आलं, की तीन वर्षांपूर्वीचा तो प्रसंग आठवतो...! त्या प्रसंगातून निर्माण होऊ घातलेली 'झाशीची राणी' आजतरी तुरुंगात सक्त-मजूरी भोगते आहे. आणखी दोन वर्षांनी ती सुटणार आहे. तसे महत्त्वाचे कर्णधार लोक, कटाचे सुत्रधार, उठावाचे नेते तुरुंगात गेलेच नाहीत. त्यांच्यावरचे आरोप सिद्धच होऊ शकले नाहीत. त्यामुळे आक्टोबर १९७१ मध्ये–म्हणजे तीनच महिन्यां-पूर्वी–ते निर्दोष सुटले. एकूण जवळजवळ २०० जणांवरती खटले भरले होते. त्यां-पैकी एकेक काढून घेता, घेता प्रत्यक्षात ७० जणांवरच प्रत्यक्ष केसेस चालल्या व त्यांपैकी फक्त आठांनाच, पाच पाच वर्षांच्या शिक्षा झाल्या, बाकीच्यांना बाइज्जत

मुलाहिजा रिहा करण्याची दरखास्त सेशन जज्ज महंमद अली यांनी ऑक्टोबर १९७१ मध्ये कालिकत कोर्टात पेश केली. सामाजिक स्वास्थ्यास बाध आणणारी ही पंचमस्तंभीय मंडळी निर्दोष सुटल्यानंतर ठीक दोनच महिन्यांनी तेथे पुन्हा दंगा होतो ही गोष्ट सूचक नव्हे काय ?

ऑक्टोबर १९६८ मध्ये उठावाचा कट शिजला. त्यापूर्वीच सूत्रधार कुनीकल नारायणन् याने आपली होती नव्हती ती घरदार शेतीवाडी विकून तिचा पैसा केला. त्याची पतिव्रता पत्नी मंदाकिनी हिने तिच्या नौकरीचा राजीनामा दिला. कालिकतच्या गुजराथी हायस्कूलात ती हेड-मास्तरीण होती. आई-बापांबरोबर कन्या अजितादेखील निघाली...२१ नोव्हेंबर १९६८ रोजी सुमारे ३०० सशस्त्र लोकांसह त्यांनी तेलिचेरी पोलीस स्टेशनवर बंदुका पळविण्याकरिता हल्ला केला. त्यापूर्वी फोनच्या तारा तोडणे, बॉम्ब फेकणे इ. सर्व सद्‌गुरु माओ यांच्या सल्ल्यानुसार यथासांग केले होतेच. नारायणने 'आर्म्स'वर पहारा करणाऱ्या शिपायावर बॉम्ब फेकला. त्याने खाली पडता पडता धोक्याची घंटा वाजवली. पोलीस सावध झाले. गोळीबार सुरू होताच जमाव पळून गेला. तरीही त्यांच्यापैकी दोघेजण पोलिसांच्या हाती सापडलेच. त्यानंतर ठीक अठ्ठेचाळीस तासांचा अवधी पोलिसांना चौकशीस मिळाला होता, पण...२३ नोव्हेंबरच्या रात्री बंडखोरांनी पुलपल्ली पोलीस स्टेशनवर अधिक तयारीने हल्ला केला. ज्यांच्याजवळ बंदुका नव्हत्या त्यांनी भाले, चाकू-सुऱ्यांचा सर्रास वापर केला. रेकॉर्ड जाळले, बिनतारी यंत्राने पोलिसांनी संदेश पाठवू नये म्हणून तो सारा सेट उध्वस्त केला ! ड्यूटीवरच्या हवालदार कुन्हीकृष्णने तेथेच प्राण सोडला. सब-इन्स्पेक्टर शंकुन्नी रक्तबंबाळ होऊन पडला अन् हॉस्पिटलात खलास झाला. जमावापैकी गोपाळच्या हातात असणारा बॉम्ब, धक्का लागून उडाला न् त्याचा उजवा हातही हवेत उडाला. पोलिसांच्या गोळीने किसनथोंपन लंगडा होऊन कोसळला. पण त्याला कटाचे धागेदोरे ठाऊक होते. त्यामुळे तो पोलिसांच्या हाती लागू देणे धोक्याचे होते. जाता जाता त्याच्याच मित्रांनी त्याला गोळ्या घातल्या व ' मित्रकर्तव्य ' पार पाडले. कदाचित माओपुराणात तसे लिहिलेले असेल ! पुढे कुनीकल नारायण आणि मंडळी यांनी, तेथील दोन धनाढ्य सावकार थिम्मप्पा चेट्टी व दासप्पा चेट्टी यांच्या घरावर दरवडा घालून लूटमार केली. पैसा, दागिनाच नव्हे तर धान्य कपडे गुरेढोरेदेखील !

खटल्याचा निकाल लागण्यास तीन वर्षे लागली. २९ आक्टोबर ७१ रोजी केसचा ' निकाल लागला ! '. फक्त आठ जणांस प्रत्येकी पाच वर्षे सजा. न्यायाधीश निकाल-पत्रात म्हणतात:– ' या लोकांचा हवालदार कुन्हीकृष्णन्‌चा खून करण्याचा हेतू नव्हता. झालेल्या गडबडीत तो ठार झाला इतकंच. ' सबइन्स्पेक्टर शंकुन्नीच्या आरोपीस कुठल्यातरी कायद्याचे कलमातील पळवाट सापडली. शंकुन्नीचा तो आत्मा, भूत होऊन आरोपीचा समाचार घेईल तर घेवो बिचारा ! खटल्याचा

निकाल ऐकण्यास जातानाचा प्रसंगही तसाच सूचक आहे. हे सारेजण कोहळीकोड (कालिकत) डिस्ट्रिक्ट सेंट्रल जेलमध्ये होते. जाताना कुनीकल नारायण, मंदाकिनी, अजिता (वय २१) यांनी हट्ट धरला की, 'माओ'चा मोठ्ठा फोटो आम्हाला कोर्टात बरोबर न्यायचा आहे! तुरुंगाच्या फाटकातून बाहेर पडताना त्यांची झडती झाली, तीत माओ-वाङ्मय, माओ-फोटो सापडले. ते पहारेकऱ्यांनी म्हणे फाडून टाकले. प्रत्यक्ष कोर्टात जज्ज्याच्या भाषणाआधी त्यानेच भाषण ठोकले, 'या फोटोच्या एकेका तुकड्याचा बदला घेतला पाहिजे. आमची चळवळ अशी दडपता येणार नाही. आमचा चेअरमन माओ झिंदाबाद!' शेवटी, त्यांना फोटो कोर्टात नेऊ देण्यास 'वरून' परवानगी मिळाली. यामध्ये निकालपत्र वाचण्यास फक्त पाच तास उशीर झाला. आपण सारेजण मुख्यमुख्य सूत्रधार सुटणार आहोत, फोटो नेण्यास परवानगी आहे हे सारे त्याला म्हणे 'आधीच ठाऊक' होते!

देशात शांतता सुव्यवस्था नांदायाची असेल तर कायदा बलवान हवा, खऱ्या पंचमस्तंभीयांना सोडणारा नसावा, सरळमार्गी जनतेस छळणारा नसावा. असे जेव्हा होत नाही, तेव्हा गुंडांना त्याची जरब वाटेनाशी होते. पकडले गेलो तरी नक्की सुटू असा त्यांना आत्मविश्वास वाटतो. त्यामुळे आज जरी ठराविक एका केरळात अशांतता असली तरी आग पसरण्यास वेळ लागत नसतो, हेपण विसरता कामा नये. अशांततेचा फायदा शत्रूला मिळतो. त्यांचा बंदोबस्त कितीतरी आधीच व्हायला हवा होता. उठावाचा कट कित्येक महिने चालू होता म्हणे. कुनीकल नारायणन्‌ने माओ-वाङ्मय मल्याळम्‌मध्ये हजारो-लाखो प्रतींनी प्रसिद्ध केले. इतकेच नव्हे तर डिसेंबर '६६ मध्ये चिनी वकिलाकडून मदतीचे आश्वासन मिळवले. चिनी-एंबसीशी झालेला पत्रव्यवहार पोलिसांच्या हाती लागूनही चौकशीची चक्रे इतक्या मंदगतीने कशी फिरली? डिसेंबर ६६ ते नोव्हेंबर ६८ हा काळ थोडा थिडका नव्हता ना? कुठेतरी काहीतरी चुकते आहे असे कुणाही भारतीय नागरिकास वाटल्याशिवाय राहणार नाही. देशविघातक कारवायांचा बंदोबस्त वेळीच झाला पाहिजे, मग त्याचे स्वरूप कोणतेही असो. नाहीतर दरवेळी नवनव्या स्वरूपात या कारवाया देशाला पोखरीत असतात.

आज तेलिचेरी शांत आहे! मिरवणुकीवर चपला येताच जमाव संतापला. चपला फेकणारी मंडळी ज्या हॉटेलात लपली ते जळाले. निधर्मी राज्यातील वृत्तपत्रांनी कुठल्याही धर्माचा उल्लेख करायचा नसतो. पुढे २४ तास शहराचा ताबा दंगलखोरांकडेच जणू होता. एकमेकांनी एकमेकांची दुकाने लुटली, एकमेकांची 'प्रार्थनास्थाने' जाळली, काही हॉटेल्स व एक पेट्रोल बंक आगीच्या भक्षस्थानी पडला. मृत्यू किती, जखमी किती? मालमत्तेच्या नुकसानीचा आकडा किती? कुणा जमातीचे नुकसान अधिक यापेक्षा अधिक गंभीर बाब ही, की देशाच्या दारात शत्रू ठाण मांडून बसलेला असताना अशा घटना घडतात! देवा रे तूच वाचव आता! अय्यपास्वामी, आम्ही तुला शरण आलो आहोत! स्वामीये शरणम् अय्यप्पा! ◻ ◻

# युद्धशास्त्राच्या एका तरुण अभ्यासकाचे विचार....

प्रतिनिधी

डॉ. मिलिंद गाडगीळ या नावाचे माझे एक मित्र आहेत. इतिहास आणि युद्धशास्त्र या विषयांत त्यांनी अग्रक्रमाचे प्राविण्य मिळविले असून अत्यंत तरुण वयातही या विषयांतील तज्ञ म्हणून नाव मिळविले आहे. युद्धशास्त्र याच विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळविली आहे. सध्या ते दिल्लीच्या 'मदरलॅन्ड' या इंग्रजी दैनिकात काम करतात आणि नुकत्याच झालेल्या भारत-पाक युद्धाच्या वेळी त्या दैनिकाचे युद्ध वार्ताहर म्हणून जम्मूपासून कच्छपर्यंतच्या सरहद्दीवर दौरा करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली होती. अलीकडेच त्यांनी मुंबईत काही दिवस मुक्काम केला होता. येथे त्यांची या विषयावर अनेक ठिकाणी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्यांच्याशी काही चर्चाही झाली.

युद्धसमाप्त होऊन तसे बरेच दिवस लोटले आहेत खरे, पण अजूनही सर्वत्र युद्धाबाबत चर्चा चालूच आहे. पाकचे राष्ट्राध्यक्ष भुत्तो हे अजूनही युद्धाची खुमखुमी असल्याप्रमाणे बोलत आहेत. तेव्हा थोड्याच काळात पुन्हा युद्ध होईल का असा प्रश्न विचारला जात आहे.

डॉ. गाडगीळ यांनी १९६२, ६५ व ७१ या तिन्ही युद्धांचा अभ्यास केला आहे. यद्धकाळात सीमेचा दौरा केला आहे. तेव्हा या विषयातील त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीचे चालू युद्धाचे व पुढील परिस्थितीचे मूल्यमापन काय आहे हे पाहणे खास च माहितीपूर्ण ठरेल.

बासष्टच्या युद्धात साऱ्याच गोष्टींची कमतरता होती. भारतीय सेनापतींमध्ये एकवाक्यता नव्हती. सैन्याच्या निरनिराळ्या रेजिमेंटस्मध्ये तर चक्क लाथाळी चालू होती. 'आम्ही चांगले लढलो पण दुसरी रेजिमेंट चांगले लढू शकली नाही' अशा प्रकारे पराजयाची जबाबदारी इतरांवर टाकण्याची प्रवृत्ती त्यांच्यात होती.

त्यामानाने ६५ च्या युद्धाच्या वेळी परिस्थिती बरीच सुधारलेली होती. जनरल्सचे संबंध ६२ प्रमाणे नव्हते. निरनिराळ्या रेजिमेंटस्मध्ये लाथाळी नव्हती. ६२ सारखी कमतरता नव्हती, मात्र दारुगोळा जपून वापरा असा सैन्याला हुकूम होता. ७१ सालचं चित्र पूर्णपणे वेगळे होते. सेनाधिकाऱ्यात संपूर्ण एकवाक्यता दिसून आली. रेजिमेंट्स्मधील संबंध फार चांगले होते आणि दारुगोळा तर पूर्णपणे मुबलक होता. हे युद्ध म्हणजे 'वॉर ऑफ प्लेन्टी' होते असेच म्हणावे लागेल. याशिवाय तिन्ही सैन्यदळात चांगलीच सुसूत्रता होती, चांगले टीमवर्क होते.

आपण आपल्या सैन्य दळाचे हवे तसे कौतुक करण्यात थोडे मागेच आहोत. अजूनही ६७ च्या अरब-इस्रायल युद्धातील इस्रायलच्या विजयाची आपण तोंड भरून स्तुती करतो पण इस्रायलचा विजय हा तितकासा नेत्रदीपक नव्हता. यात इस्रायलला कमी लेखण्याचा प्रयत्न बिलकूल नाही, पण आपला दैदिप्यमान विजय पहा. त्याचे कौतुक करा. गेल्या दिडशे वर्षाचा इतिहास पाहिला तर अरबांकडे ज्याला 'रेक्गनाइजड् आर्मी' असे म्हणतात तशी सेना कधीच नव्हती. टोळच्या टोळचांचे सैन्य व भुरटे हल्ले यांचेच तेथे प्राबल्य असे. 'लॉरेन्स ऑफ अरेबिया'च्या नेतृत्वाखाली संघटित होण्याचा एक छोटा प्रयत्न झाला पण वरील अर्थाने अरबांकडे सैन्य कधीच नव्हते. त्यामुळेच इस्रायलचा विजय तसा नेत्रदीपक नव्हता. तर फाळणीपूर्व काळापासूनच भारतीय उपखंडात 'रेक्गनाइजड् आर्मी'चा वारसा होता. फाळणी झाली तरी भारत-पाकचे सैन्य 'रेकगनाइजड्' होते. अडचणी काय फक्त पाकला होत्या? त्या भारत-पाकिस्तानला समान होत्या पण तरीही आपण विजय मिळविला. भारताचे सैन्य आमच्या अडीच पट असल्याचा पाकने डांगोरा पिटला होता. भारताचे सैन्य हे पाक सैन्याच्या २।। पट असले तरी आपल्या सैन्याच्या ३२ डिव्हिजन्सपैकी सुमारे १४ ते १५ डिव्हिजन्स, उत्तर हिमालयातील भारत-चीनच्या १५०० मैल सरहद्दीवर ठेवाव्या लागतात. सुमारे ४ डिव्हिजन्स, नागालॅन्ड, व मिझोहिल्स सारख्या भागांत बंडखोरांच्या समाचारासाठी ठेवाव्या लागतात. म्हणजे उरल्या सुमारे १४ डिव्हिजन्स. त्यांपैकी पश्चिम सरहद्दीवर भारताच्या ८ डिव्हिजन्स होत्या तर पाकच्या ३ डिव्हिजन्स आणि पूर्वेकडे भारताच्या ६ डिव्हिजन्स तर पाकिस्तानच्या ४ डिव्हिजन्स. याचा अर्थ असा, की युद्धात भारतीय सैन्य हे पाकच्या अवघे दीडपटच होते. युद्धशास्त्राच्या साध्या नियमानुसार युद्ध जिंकण्यासाठी कमीत कमी एकास तीन हे प्रमाण असावे लागते. उत्तर हिमालयातील सीमेवरील पलटणी युद्धासाठी पुर्व-पश्चिम सरहद्दीवर हलविणे शक्य नव्हते. एक म्हणजे तेवढे त्या तिथे असणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे तेथील डोंगरी पलटणींची रचना व कार्यच वेगळे आहे. या पलटणी हिमालयातून खाली उतरवणे अवजड. उतरवल्याच तर त्यांच्या वहातुकींच्या समस्या अधिक अडचणीच्या. मैदानातील युद्धात सरळ व लांब पल्ल्याच्या तोफा लागतात तर

डोंगरी पलटणीच्या तोफांचे कार्य असे असून चालत नाही. डोंगरापलीकडे दबा धरून असलेल्या शत्रूवर हमला करण्यासाठी उंच पल्ला महत्वाचा असतो. तेव्हा अशा या परिस्थितीत सुमारे १ लाख सैन्य न लढता पूर्णपणे शरण येणे ही साधी-सुधी गोष्ट नव्हे. दुसऱ्या महायुद्धानंतरचा जगातील हा सर्वात मोठा विजय. कारण कोरियन युद्धात सुमारे ४० हजार सैनिक शरण आले तर इंडो-चीनमधील ' दिएन बिएन फू ' येथे ११ हजार फ्रेंच सैन्य व्हिएतनामी सैन्याला शरण गेले. म्हणून श्री. गाडगीळ यांनी मुंबईतील मुक्कामात त्यांच्या इस्रायली मित्रांना विचारले, की जनरल मोशे दायानला प्रशिक्षणासाठी जनरल माणेकशा यांच्याकडे केव्हा पाठवता बोला !

यावेळी भारत-चीन सीमेवरही आपली जय्यत तयारी होती. चीनच्या थोड्या-शाही चिथावणीखोर कृत्याला जशास तसे उत्तर द्या, चीनने हल्ला केल्यास स्थानिक स्वरूपाचे व मर्यादित का होईनात पण ठामपणे प्रतिहल्ल्यानेच उत्तर द्या, असा या वेळी सैन्याला हुकूम होता. योग्य त्या प्रकारे चीनच्या कोणत्याही हल्ल्याला उत्तर देण्याची आता आपल्या सैन्याची तयारी व आत्मविश्वास आहे. पण चिनी सैन्याची तशी आक्रमक हालचाल नव्हती. अशा तक्रारीसाठी सुमारे पाच-सहा महिने लागतात आणि गुप्तहेर खाते जागरूक असले तर ही बातमी योग्य वेळी मिळू शकते, आपल्यालाही तयारी करता येते. म्हणून तर दिल्लीत आपले राजकीय नेते याबाबत निश्चित होते. आपल्या मनात एक गोष्ट ठसून राहिली आहे, की दर साली लाल सैन्याच्या लाटाच्या लाटा पुढे सरकत होत्या, पण हे खरे नव्हे. भारताप्रमाणे चिनी सैन्यालाही अडचणींना तोंड द्यावे लागते. तीही माणसेच आहेत. १२ महिने हल्ल्या-साठी कोणतीच बाजू तयार राहू शकत नाही. ६२ साली चिन्यांनी काही ठराविक मर्मस्थानी हल्ले केले. भारतीय सैन्याची जमवाजमवा झाली नव्हती. चौक्याचौक्यां-वर शंभर–दीडशे सैनिक होते व त्यांना चौक्या लढविण्याचा हुकूम होता. त्यामुळे चिनी सैन्याला त्यांना कोंडीत पकडता आले. पॉकेटस् निर्माण झाली. आपले सैन्य अडकून पडले. चिनी विजयी झाले. नियती कशी असते पहा. यावेळी आपण पाकची अशी गत केली. पाक सैन्याला एकत्र येऊ न देता ठराविक मर्मस्थानी आपण घाव घातले. ढाक्का विजयाची बातमी येत नव्हती याला विलंब का लागला ? तर आपले सैन्य विखुरले गेले होते. ढाक्क्याची तटबंदी तर मजबूत होती. अशा वेळी सैन्याची व दारुगोळ्याची जमवाजमव न करता आपले सैन्य ढाक्क्यावर चालून गेले असते तर आपल्याला माघार घ्यावी लागली असती. यावर जनरल माणेकशांचा डावपेच होता तो शरणागतीच्या मागणीचा. यामुळे आपल्या सैन्याला जमवाजमवीला वेळ मिळणार होता. जनरल नियाझीने शेवटचा सैनिक असेपर्यंत लढण्याची घोषणा केली होती. यात त्याचा डाव होता. शरणागती पत्करायला नकार दिल्यामुळे भान सोडून भारतीय सैन्य ढाक्क्यावर हल्ला करील असे त्याला वाटले, पण जनरल

माणेकशाने तसे होऊ दिले नाही. आणि आपली पूर्ण तयारी होताच भारतीय सैन्य ढाक्क्याकडे चालू लागले आणि मग पराजय दिसू लागताच शेवटचा सैनिक असेपर्यंत लढण्याची भाषा बोलणारा नियाझी शरण आला.

युद्धातील यशात ५० टक्के वाटा नेतृत्वाचा असतो. आपले नेतृत्व अधिक चांगले होते. प्रथम पाकने चढाईचा पवित्रा घेतला खरा, पण त्यानतर बाजू आपल्या हाती होती.

भारतीय सैन्याच्या यशाला गालबोट लावण्याचा प्रयत्न रॉयटर, ए. पी.सारख्या वृत्तसंस्था करीत होत्या. भारतीय विमाने, जहाजे, रणगाडे रशियन्स चालवीत असल्याच्या बातम्या या वृत्तसंस्था प्रसृत करीत होत्या. म्हणून डॉ. गाडगीळ हे त्यांच्या बरोबरच्या ए. पी., रॉयटरच्या वार्ताहरांना खिजवण्यासाठी प्रत्येक ठिकाणी 'कुठे आहेत ते रशियन्स, दाखवा मला रशियन्स !' म्हणून सेनाधिकाऱ्यांना सांगत असत. पण होते का तेथे रशियन्स ? होते ! होते ना तेथे रशियन्स, पण ते होते 'टास' या रशियन वृत्तसंस्थेचे वार्ताहर !

पंजाबातील लोकांचे मनोधैर्य लाजवाब होते. हा लग्नाचा सीझन. युद्धकाळातही लग्ने होत होती. मात्र प्रकाशबंदीमुळे वराती काढणे शक्य नसल्याने लोकांच्या उत्साहावर विरजण पडले होते. पंजाबातील लोकांच्या धैर्याचा किस्सा डॉ. मिलिंद गाडगीळ यांनी सांगितला. अमेरिकेतील 'वॉशिंग्टन पोस्ट' या वर्तमानपत्राने हा प्रसंग तर चौकटीत दिला होता. अमृतसर येथील एका उपहारगृहात हे सारे युद्ध-वार्ताहर खात बसले होते. समोरच एक सरदारजी कबाब खात बसले होते. अगदी मोठ्या चवीत ते कबाबचा आस्वाद घेत होते. तेवढ्यात हवाई हल्ल्याचा भोंगा वाजला. बहुतेक टेहळणी करणारेच विमान असावे ते. सरदारजींनी पाकिस्तानला व त्या वैमानिकाला काही शिव्या हासडल्या व म्हणाला, 'बाकी काही झाले नाही म्हणा, पण माझ्या कबाब खाण्यात मात्र व्यत्यय आला !' पंजाबातील सीमेवरील गावातील व्यवहारही अगदी सुरळीत चालू होते.

यावेळी उगीचच नेत्रदीपक असे काही करून न दाखविता लष्करीदृष्टया योग्य व आवश्यक तेच आपण केले व हेच महत्त्वाचे होते !

गेल्या वेळेप्रमाणे सरगोधा, लाहोर, चकलाला, पेशावर आदी विमानतळांवर आपण डोके आपटत बसलो नाही. तेथील विमानतळ व धावपट्टया अतिशय मजबूत आहेत. आपलेही उत्तरेकडील व सीमेवरील विमानतळ असेच मजबूत आहेत. त्यांचे विमानतळ फोडण्यासाठी सतत सहा सहा तास व अत्यंत प्रभावी अशा बॉम्बर्सनी हल्ले करावे लागले असते. इस्रायलने अरबांविरुद्धच्या हवाई हल्ल्यात विमानतळ निकामी करण्यासाठी 'ग्रॅन्ड स्लॅम' किंवा 'अर्थ क्वेक' या नावाने ओळखले जाणारे ४२,००० पौंडी बॉम्बस् वापरले व तेही सतत ३६ तास हवाई हल्ले चालू ठेवून.

यावेळी हाजीपीर खिंड हे आपले लक्ष नव्हते. ६५ च्या लढाईनंतर अमेरिकेने

तेथे मजबूत तटबंदी उभारून दिली आहे व गेल्या वेळी पाक घुसखोर तेथूनच काश्मिरात शिरले होते. त्यांचा मार्ग बंद करण्यासाठी ते हाती घेणे आवश्यक होते. यावेळी तसा प्रकार नव्हता. म्हणूनच तेथील पाक सैनिकांच्या कपड्यांची कांजी जशीच्या तशी राहिली. तेथे शक्ती फुकट घालविण्यात काही अर्थ नव्हता. रक्त गाळण्यापेक्षा अधिक घाम गाळायचा असतो. तो आपल्या सैन्याने गाळला. कारण ते धावपळीत युद्ध करून शत्रूची धावपळ करीत होते.

वाळवंटी युद्धात साऱ्याच हालचाली अनपेक्षितपणे करायच्या असतात. राजस्थानातील वाळवंटात आपण हेच केलं आणि पाकिस्तानवर कुरघोडी केली. त्याच भागात एका ठिकाणी कात्रीत सापडलेल्या आपल्या एका सैन्यदलाने बचावाऐवजी हल्ला केला. जोधपूरपर्यंत पाक सैन्य येऊन आपली रसद कापण्याऐवजी त्यांनी ते पाकिस्तानी भागात जाऊन केलं व शत्रूला आश्चर्यचकित केलं. यावेळी युद्ध शत्रु-प्रदेशात झाले. ६५ प्रमाणे काही प्रसंगी ते भारतीय भागात झाले होते तसे यावेळी झाले नाही. विमानदलाने व नौदलाने सैन्याला फारच चांगली साथ दिली. नाविक हल्ल्यात भाग घेणाऱ्या काफिल्याला २५ टक्के नुकसान होईल असे गृहीत धरावे लागते पण दोन्ही वेळा यशस्वी हल्ला करून जवळ जवळ काहीही नुकसान न होता आपले काफिले परत आले.

आता एक होणे आवश्यक आहे. आपण अण्वस्त्रे तयार केली पाहिजेत. चीनची अर्थव्यवस्था अमेरिका, रशियाच्या मानाने कमीच आहे, पण अण्वस्त्रामुळे चीन बडे राष्ट्र झाले आहे व ही ताकद असली, की कोणी वाकड्या नजरेने पाहण्याचे धैर्यच करणार नाही.



आसमंतातील मिट्ट काळ्याभोर कॅनव्हासवर लांबून येणारी गाडी हेडलाईटच्या फटकाऱ्याने निरनिराळी दृष्यं चितारीत होती आणि पाण्यावर काठी मारून होताच ते जसं एकजीव व्हावं तसंच ती गाडी विरल्यावर हा कॅनव्हासही एकजीव होत होता. त्या कॅनव्हासवर वारा अदृश्य पण भयानक दृष्ये फटकारीत होता. पण ती दृष्ये फक्त जाणवतच होती. त्यामुळे ती न दिसताही अंगावर शहारे येत होते.

प्रयाग चिखलीकडे चाललेल्या गुऱ्हाळाच्या चुलवाणाची ऊब वाऱ्यावर तरंगत येऊन हलकेच अंगावर बसत होती. नदीच्या दुतर्फा असलेल्या उसमळ्यात आगट्या पेटल्या होत्या. त्यांचा उजेड काजव्या सारखा मधूनच फ्लॅश मारून जायचा. एंजिनातील वाफ भस्सस् करीत बाहेर घुसावी तसा पानांचा आवाज होत होता. आवाज बसलेल्या माणसाने एकदम हवा गेल्यावर हसावे तसा एखादा बेडूक ओरडत होता. मशिनगन मधून सुटणाऱ्या गोळ्याप्रमाणे काही बेडूक टर्रर्रऽऽ टऽऽ करीत ओरडत होते.

घाटावर बसलं, की पुलाच्या चार कमानी त्या काळ्या वातावरणातही उठून




सु. ना. कुलकर्णी

दिसायच्या. वळणावरच्या गाडीचा झोत कमानींवरून फिरला की, त्यांवर आदळून चक्राकार गतीनं पुढं झेपावणारं पाणी दिसायचं. झोत फिरून पुलावर आला, की कमानींची भींत व्हायची नी त्यांवर आदळणाऱ्या पाण्याचा फक्त आवाज यायचा. क्षण. दोन क्षण पुलाचे कठडे उजळून जायचे. गावाकडच्या बाजूस असलेल्या टोकाला चौकी आणि चेकपोस्ट होतं. तिथे नाही म्हणायला किंचित जाग होती. अधूनमधून एखादी सावली बाहेर डोकावायची, चार दोन शब्द हवेत तरंगू लागायचे, नि वाऱ्याबरोबर नदीपलीकडच्या स्मशानात लुप्त होऊन जायचे. घाटावरच्या अनुकामिनिकेच्या देवळाचे तट पाण्याकड पाहात गप्प उभे होते. इतका दाट काळोख त्यांनीही कधी पाहिला नसावा. देवळातील कुत्र्यांनी सापडेल त्या आडोशाचा आधार घेऊन किंवा एकमेकांचा आधार घेऊन अंगाची केव्हाच मुटकुळी करून टाकली होती. " जागते रहो " म्हणत्या पेंगत्या शिपायाप्रमाणे मध्येच एखादे कुत्रे भूंकून परत घुसमटून घेत होते. आणि जाबडत उठावे तसे एखादे पिल्लू गुरगुरत उठायचे नि परत आईच्या स्तनाला लटकायचे.

हळूहळू चेकपोस्टवरची बत्ती विझली. तिथल्या कारकुनाने डोक्यावरचा मुगुट नाकावर उतरवला. आणि लगेच खर्जात तो घोरू लागला. ड्युटीवरचा पहारेकरी मात्र जांभया देत चुटक्या वाजवून झोपेला दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. चहा प्यावा म्हटलं तर अजूनही ' भवानी ' झाली नव्हती. अकरा वाजून गेले तरी चुकलेलं सावज येत नव्हतं. त्यामुळं झोप जाणं महाकठीण झालं होतं.

स्मशानभूमीचा रखवालदार मात्र दरवाजा लावून घेऊन पडळीत चीप बसला होता. त्याने-भोलारामने एक कडकडून जांभई दिली. एकदा डाव्या मांडीला एकदा उजव्या मांडीला तटणी लावून कटकट करीत कमरेची हाडे ढिली केली. आलकट पालकट मोडून त्यांनं कट्ट्यावरून पाय खाली सोडले. आजच्या रात्रीत अजून कोणाचीच आगटी पेटली नव्हती. थंडीतर स्वतःला पेटवूनच घ्यावी अशी पडली होती. अंधारात नदीचा काठ नि डोह कुठंच जाणवत नव्हता. एखादं वाघूळ अंधार शिंदत इकडून तिकडे फडफडत होतं. पाण्यावरून एखादी टिटवी टिटँव, टिट्टँव करीत चाचपडत फिरत होती. स्मशानाच्या दारावर असलेल्या रॉकेलच्या दिव्यावर काजळी साठल्याने त्याचा प्रकाशही काळा पडत होता. मग त्यापासून ऊब ती काय मिळणार ? दुपारी चार वाजता जळून गेलेल्या चितेची किंचित उब होती म्हणून बरं ! पण ती चिताही आता राम म्हणण्याच्या बेतात होती.

" आयला आजची रात काकडतच घालवायला पायजे तर ! आज कुणाचीच पालखी दिसत नाही. एकांदी तरी आली असती म्हंजी गारठा कमी झाला असता एकांदी शिगरेट, एकांदा रुपाया, कायबाय मिलाला असता. तांबडं फुटल्यावर पुलावरच्या हॉटेलात जाऊन गरम चहा भजी खाया आली असती. पर आता

समदाच इस्कोट!"

त्यानं वर पाहून हात जोडले,

"देवा नारायना, किरपा कर, कोनतरी संपू दे लौकर आनि इकडं येऊ दे! न्हाईतर या म्हाताऱ्याची असल्या गारठ्यात काय कड लागायची न्हाई बघ! आनि सक्काळपत्तूर माझीच लाकडं होऊन जायाची!"

पुलावरच्या चेक पोस्टावरच्या पहारेकऱ्यानं बारा टोल दिले. भोलाच्या डोळ्यावरची झोप आजूबाजूच्या अंधाराइतकी गडद होऊन गेली. हातातला सोटा गळायला लागला. दिवसा कारकुनानं लेखणी हाताळावी तसा तो सोटा भोलाराम हातात खेळवीत असे. आता मात्र तो सोटा भलताच जड वाटू लागला. थंडीमुळे तोही बिचारा जडशील झाला होता. सोटा खाली पडताच भोलाच्या शरीरानं आपलं गाठोडं करून घेतलं नि निद्रेच्या डोहात गडगडवून टाकून दिलं.

मध्येच कधीतरी जाग आली. आणि मग त्यानं पाय लांबवले. हातावर हात चोळले. मानेखाली घासले. एकदम खालून उजेड दिसू लागला. जमीनीवरच कान असल्यानं पायरव ऐकू आले. हळूहळू आवाज येऊ लागले. तशी भोलाची झोप पार पळून गेली. त्या पायरवात मिसळून गेली.

कुणाची तरी पालखी आली होती. भोलाची प्रार्थना देवानं ऐकली होती.

लग्नघरातला पुलंचा नारायण जसा घुमावा तसा तो हलू लागला. आता त्याच्या डोसक्यात "पालखी" शिरली होती.

डोक्यावरचं मुंडासं त्यानं करकचून आवळलं. स्मशानभूमीचा दरवाजा उघडला. हां हां म्हणता टेकाडाच्या बाजूनं माणसं दिसू लागली.

"बामनाची पालखी हाय जनू? धा बाराच टकली दिसत्यात! मंग काय मिलनार न्हाईसं दिसतंय" भोला पुटपुटत उभा राहिला.

थोड्या वेळात कट्टीवर पालखी आली. खांदे बदलले गेले नि मग झपाझपा माणसं आत आली. आतल्या कोरड्या पडवीत पालखी उतरवली गेली. मडकं धरणाऱ्या माणसाकडून त्यानं ते मागून घेतलं. झुरळ झटकावं तितक्या चटपटपणे त्यानं ते भोलाकडे दिलं. गरम झळ लागताच भोलाची बोटं सुट्टी झाली.

सगळी माणसं आत आली. जबाबाला आणलेल्या साक्षीदारांसारखी जागा मिळेल तिथं उभी राहिली. प्रत्येकजण आडोसा मागत होता. बहुतेकांनी टापशी म्हणून गरम मफलरच गुंडाळले होते. अंगात कोणाच्या स्वेटर तर कोणाच्या शाल होती.

इतक्यात कोणीतरी सायकलवरून आलं. भोलाराम लगेच तिकडे धावला. सायकल घेतली स्टँडला लावली. त्या माणसानं कॅरिअरवरची पिशवी काढली. हार, फुलं, उदबत्ती, गुलाल त्यानं काढला. आता कुणाच्या हाती द्यावं अशा विचारात असतानाच भोलाराम पुढं धावला.

त्यानं झटपट फुलं विस्कटून टाकली. हार टाकला गळयावर नि गुलाल चेहऱ्यावर माखला. पुजाऱ्यानं मारुतीला शेंदूर थापावा तितक्याच सहजतेनं ! उदबत्ती पेटवली नि त्या प्रेताच्याच एका बाजूला खोवली. मग तो मघाच्या मडकं धरलेल्या माणसाकडे गेला.

" साब कोणची घालू ? जंगल, बाभळ का चंदन !"

" घाल कोणची तरी !" आमची हाडं......असं कायसं म्हटल्याचं भोलाच्या कानांनी ऐकलं ! म्हाताऱ्यानं लई दमवल्यालं दिसतंय ! समदीच कट्टाळल्यात !' भोला पुटपुटला.

तो झपाटयानं गुदामात शिरला. तिथं वळचणीला पडलेल्या कुत्र्याचं गाठोडं त्यानं उचललं नि अलगदपणे कोळश्याच्या पोत्यावर नेऊन ठेवलं. लहान पोरासारखं त्यानं थोडसं कुईकुई केलं नि परत कोळशाच्या उबीत घुसमटून घेतलं. मग भोलानं भराभर बाभळीची लाकडं पुढे ओढली. दणादण चार घाव घालून मोटया गाठी फोडून टाकल्या. आडवे व्हंडे सोलून काढले. अर्धी फुटकी न फुटलेली सगळी लाकडं घेऊन तो बाहेर आला. थोडीशी सप्पय जागा बघून त्यानं ते भराभर एकमेकावर रचले.

" सुतळी तोडलीया का !" त्यानं त्या सर्वांना मिळून पण प्रत्येकाकडे पाहात विचारलं. विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर येत नसलं म्हणजे पोरगं मास्तरकडे ज्या नजरेनं पाहत तसंच ही माणसं त्याच्याकडे पाहू लागली. मग भोला उठला, प्रेताजवळ जाऊन त्यानं कचाकचा सुतळया तोडून टाकल्या. तिथली उदबत्ती घ्यायची सुतळीला लावायची, जराशी जळाच्यावर न तुटायला ती काय खाणावळीतील चपाती होती ?

" कोण हात लावणार हायसा का ?" त्यानं परत विचारलं. परत एकजण पुढे आला. त्यानं खरंच नुसता मोळी उचलताना हात देतात तसा हात दिला अन् बाजूला झाला.

" आयला, जडशील लागतंय, किती उशेरानं बांधलंय कुणाला ठावं ? " असं म्हणतम्हणत त्यानं हळूच त्या प्रेताची कंबर हाताची, बोटं, गळा चाचपडून पाहिला. गळयात कायसं लागलं त्याबरोबर ते लगेच त्यानं तोडून हाताखाली धरलं. चित्तेवर, ट्रंक आपटावी तसं ते प्रेत त्यानं आपटलं. एवढया श्रमानं त्याच्या कपाळावरचे घर्मबिंदू गॅसबत्तीच्या उजेडात चमकू लागले.

उरलेली लाकडं, पालखीवरचं उरलेलं गवत त्यानं इसकटून टाकलं. गुदामात जाऊन पिंटभर रॉकेल आणून शिंपडलं. सगळं काम तो एकटाच करीत होता. उभी असलेली माणसं जिथं बसता येईल तिथं टेकली होती. काहींनी झुरके मारायला सुरुवात केली होती. काहींनी खांदे चेपायला सुरुवात केली होती.

" लांबनं आलायसा जनू !"

" हो, ना ! मंगळवारातून इकडे आलो, काय जवळ आहे होय तुमचं स्मशान !" एक पाहुणा कुरकुरला.

" अवं समशान् गावाबाहेरच होवं न्हवं का ?" मग कुणाला जवळ कुनाला कोस-भर लांब पडनारच, तुमी कंच्या गावचं ? पाहुण्याच्या कुरकुरीवरून भोलानं ओळखलं, हे पाणी इथलं नव्हे !

" मी पुण्याहून आलो. दादा येणारे नांदेडहून ! त्याचीच वाट पाहिली घरात-स्टँडवर, स्टेशनवर निरोप ठेवून दिलाय, परस्परच या म्हणून !"

" अर्जंट तार केलीया न्हवं, मंग झालं तर !" भोलानं धीर दिला.

आणखी एक तास असाच गेला. फक्त काडयापेटीची आणि सिगरेटची फिरणी ! या शिवाय तो तास पोकळच गेला ! भोलाच्याच सात-आठ सिगरेटी झाल्या !

" आता वाट कुटंवर बघनार आधीच योळ झालाय, मंडली लई ताटलय, कवटी लौकर उडत न्हाई मंग !" भोलाला उब पाहिजे होती. थंडीनं तो काकडून गेला होता. त्यानं आणखी एक शिग्रेट मागून घेऊन पेटविली. एवढयात कोणतरी म्हटलं,

" टॅक्सी दिसतेय, आले वाटतं !" आले आले म्हणताच सेक्रेटरीनं जसं हार घेऊन पाहुण्यांच्या स्वागतासाठी धावावं तसा भोला धावला दाराकडे. एक माणुस टॅक्सीतून उतरला. चुरगाळलेली विजार, नेहरूशर्ट, गळयाला मफलर एक हात निम्माच दुमडलेला, पायांत बाटाच्या सपाता, अर्धवट बाहेर, अर्धवट आत अशी डोकावणारी चेन, हातातील लेटेस्ट डिझाईनची आंगठी, दुसऱ्या हातात सुटकेस ! केस विसकटलेले, डोळयाला चष्मा सोनेरी फ्रेमचा ! क्षणार्धात भोलानं बत्तीच्या उजेडात सारं टिपलं नि बाभळधा दर किती रुपयांनी वाढवावा याचा तो हिशेब करू लागला. वरकरणी मात्र त्यान त्या " दादाची " सुटकेस घेतली.

" साब, तुमच्या करताच समदी खुळांबल्यात जनू !" भोला अर्धवट स्वतःशी, अर्धवट त्याला उद्देशून पुटपटला. उशीरा येणाऱ्या 'प्रमुख पाहुण्याची' छटा मात्र त्या नुकत्याच आलेल्या पाहुण्याच्या तोंडावर दिसत होती. थोडीशी बेपर्वाई, विजयोन्माद नि किंचित, उसन्या शर्मिंदेपणाची छटा !

लगवगीनं त्या मडक्यातील शेणकुटातून एक निखारा काढून, दुसऱ्या एका कोरडया शेणकुटावर घालून ते भोलाने दादांच्या हाती दिलं.

कसंतरी चितेजवळ जाऊन त्यांनी ते शेणकूट चितेवर ठेवलं. भोलानं दुसऱ्या बाजूस काडीच लावली. काडी लावताच, रॉकेल घातलेलं गवत कापरासारखं पेटलं. ज्वाला धडधड आवाज करू लागल्या. थोडयाच अवधीत वाऱ्यानं चिता पसरविली. भोला तिथंच एका अंगाला बसून अंग शेकू लागला. बाकीच्या माणसांचे चेहरे, ज्वाळांचा वेडावाकडा प्रकाश पडल्याने भूतासारखे हलू लागले. त्यांच्या सावल्या खूप लांबवर पसरल्या. आकाशापर्यंत जाऊन भिडल्या.

पाठ, हात, पाय बोटं चांगली शेकून मोकळी झाल्यावर भोला उभा राहिला. आता त्याच्यातील " रखवालदार " जागा झाला. त्या दादाजवळ तो गेला.

" दादासाब, चार मन बाबळीचं इस रुपये, आन् शेनकूट रॉकेल, गवात पाच रुपय, माझी मेहनत धा रुपय, आनि डेत-टचाक्स धा रुपय ! "

त्या बाबानं लगेच धाधाच्या पाय नोटा त्याच्या हातावर ठेवल्या.

" माझ्यापाशी सुट्टं न्हाईत पाच रुपय, सक्काळचं नाक्यावरनं न्या जावा ! "

नोटा बंडीच्या आतल्या खिशात घालून तो बाजूला झाला. खाली पडलेला सोटा त्यानं वर उचलला. कट्ट्यावर चढून तो गुडघ्यावर हनुवटी टेकून जाळाकडं बघत बसला. सोटा आडवा पायावर टाकला. चिता आता रसरसली होती. धग इथपर्यंत जाणवू लागली. पुलावरचं हॉटेल उघडलं नव्हतं.

बसून बसून कढ आला तेव्हा तिथेच तो भिंतीला टेकला. डोळ्यावर झापड येऊ लागली. असाच केव्हातरी त्याचा डोळा लागला. कशानं तरी जाग आली. गुदामातलं कुत्रं पायाला येऊन चाटत होतं.

" हाड की, तिच्या बायला, " असं हाडकीत तो उठला. इकडं तिकडं पाहात त्यानं डोक्याचं मुंडासं काढून कानाभोवती गुंडाळलं. मघाच्या माणसांपैकी कोणीच नव्हतं. स्मशानाच्या दिव्यानं केव्हाच राम म्हटला होता. त्याच्या काचेवर धुकं साठलं होतं. रात्री धडधडणारी चिता आता नुसतीच धुमसत होती.

नदीचं पात्र दिसायला लागलं होतं. त्यानं खळाखळा चूळ भरली नि येता येता चितेतल्या निखाऱ्यावर रात्रीतून उरलेली अर्धी सिगारेट पेटवून झुरका घेत पुलावरच्या हॉटेलकडे तो चालू लागला.

□ □ □



केशव मेश्राम



# मृत्युगीत

विश्वातील बऱ्याच गोष्टी मानवनिर्मित आहेत. विचित्र कला किंवा प्रतिभावंत जन्मावे लागतात असे म्हटले जाते. पण मरण ही अशी गोष्ट आहे की त्यावर कुणीही व्यक्ती सारख्याच अधिकाराने बोलू शकते. मृत्यूबद्दलचे विचार स्वाभाविक असले तरी मृत्यूची जाणीव इतर जाणीवांपेक्षा वेगळी असते. ह्याच क्षण श्री. मधुकर गोविंद देशपांडे यांनी पकडला आहे. ही हृदयाला कंपित करणारी सर्वस्पर्शी जाणीव, त्यानंतर निर्माण होणारी पोकळी आणि त्यामुळे येणारे एकाकीपण परा-कोटीला गेले की त्यातूनच मनुष्य सत्य शोधण्याची धडपड करतो. श्री. देशपांडे यांना प्रतीत झालेले सूत्रच त्यांनी आपल्या मुक्तशैलीतील पंचवीस कवितांत गुंफले आहे.

'नैवेद्य', 'नाविन्याचा भास', 'ही जगाची रीत' आणि 'आहे काय जगात' या पहिल्या चार गीतांत त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.

'गोतावळ्यातले मर्म उमगायला
एकटेपणाची ग्लानी हवी...
दुःखातले सत्य कळायला। सुखाचा ध्यास हवा'

ह्याच आपल्या सूत्राचा त्यांनी पुढे खुलासा केला आहे.

भीतिग्रस्तांना हे जग फटके मारते
निर्भिडांच्या लाथा खाऊनसुद्धा वाटेस जात नाही. 'ही जगाची रीत'
भीतिमुक्त झाल्यावरच मी ओळखली !!

आणि या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या पुढील कवितांचा विस्तार केला आहे. आपण या मृत्युगीताच्या निर्मितीला कसे प्रवृत्त झालो याचे त्यांनी दिलेले काव्यात्मक उत्तर असे आहे.

'आता जीवनाला, मरणाचे पंख फुटताहेत...
पोकळीतल्या स्वैर संचाराला...'

' उदास वाट फार ' या कवितेत कवीच्या मनोवेदनेच्या छटा प्रत्ययकारक पद्धतीने प्रकट झाल्या आहेत. प्रत्येक जाणाऱ्या क्षणाचे बलिदान कवीला दुभंग बनविते. आयुष्यचक्राची गतिमानता कशानेही खंडित होत नाही. मोठे होण्याच्या उत्साहात बालपण ' फुलपाखरासारखे ' गेल्याची व्यथा, भोगात व मदिर क्षणात सरकलेले तारुण्य येते, ' सूर जमले ' रंग भरला ' अशा मनाच्या समजुतीतच अभावितपणे हे क्षण हातातून निखळतात आणि ' एकेक पायरी ' चढतानाच ' घसरण सुरू होते. आणि उदासीनतेच्या लाटांच्या धडकांनी मनाला ' हुरहुर वाटते फार ' अशा ग्लानीत कवी बुडून जातो. ही उदासीनतादेखील अखेरपर्यंत आपली सोबत करेल का याचीही खात्री वाटत नाही. याच गूढगडद भावनेतून देशपांडे खालील समर्थ शब्द लिहितात.

' अनेकांना पोहोचविले मी निर्लेप मनाने
आता मलाही पोहोचविले जाईल तशाच निर्लेप मनाने
पुन्हा सारे होतील आपापल्या कामात दंग. '

' कवच कुंडले ' ही एक रूपकाच्या भाषेतच बोलणारी कविता. जगाची वंचना स्पष्ट करणारा आत्मवंचना करणारा मानव ' जग घेते म्हणून आत्मज्ञानाचा जगाला काढा पाजतो. ' शिक्षा ', ' हे जिणेच झाले ओझे ' आणि ' आग्यामोहोळ ' या कवितांचा सूर जमला नाही. त्याचप्रमाणे ' भीती ' आणि ' बुडबुडे ' या कविताही कविता म्हणून मनात स्थिरावत नाही. त्यांतील वैचारिक धागा तत्त्वदर्शी न झाल्याने त्या रूक्ष वाटतात. तसेच भावनाला आवाहन करण्यास त्या कमी पडत असल्याने गद्यग्रथित कच्च्या अनुभवाची खडखडच त्यांतून जाणवते.

' प्रमाद ' ही कविता लहान, पण त्यातील विरोधी गुंफणीने अंतर्मुख करणारी आहे. काळाच्या नश्वरतेची कल्पना नसणारे, वचनांच्या, आश्वासनांच्या, भुलभुलैयात अडकणारे मन एका दाहक सत्याने हादरते. बुद्धाचा कुठेही उल्लेख न करता श्री. देशपांडे बुद्धचरितातील आख्यायिका शब्दांच्या मोजक्या वापरातून सूचित करतात.

' एकाएकी शरीराचे प्रेत दिसले
शब्द वितळून गेले अनंतातील नश्वरता झाली. '

याच कवितेचे पडसाद त्यांच्या त्यापुढील ' जावेच लागणार आहे ' या कवितेत उमटले आहेत. आतापर्यंत सांगितला गेलेलाच आशय सांगण्याचा कवीने अट्टाहास केल्याने कवितेच्या आरंभीच कविता परिणामशून्य बनलेली आहे.

' अखेर एक दिवस हे सारे सोडून
अनिच्छेने जावेच लागणार आहे... '

या आरंभासोबतच ' भीतीच्या पोटात ' आशेच्या गर्भात, श्रद्धेची झापडे, श्रद्धेची

काडी, आंधळयाची काठी अशी शब्दरचना आल्याने ही कविता कंटाळवाणी व रटाळ वाटते.

'म्हणे ईश्वराची लीला' ही कविता अधिक लांबलेली असली तरी तिच्यातील उपरोधामुळे ती सुसह्य वाटते. कवी आपली अनुभूती सार्वत्रिक करण्यात येथे यशस्वी झाला आहे. त्याने निर्माण केलेले प्रश्न हे साऱ्यांचेच आहेत.

'बंधनाच्या जोखडात दुःख मानायचे नाही
पण साधनांच्या धडपडीत मात्र आनंद मानायचा !'

जन्ममरण, साधन आणि मुक्तिकर्मासाठी कर्म आणि भोगण्यासाठी कर्म, अश्रु-रक्त कृतज्ञ-कृतघ्न, वर्तमानाचे अज्ञान, अज्ञाताची भीती अशा तत्वज्ञानांतर्गत परिभाषेचा त्यांनी वापर केला आहे आणि या शब्दबंबाळतेला तुझ्या लीळा आम्हाला कळू देऊ नकोस मग आमची काही हरकत नाही अशी तंबीही त्यांनी अखेरीस दिली आहे. 'तत्त्वज्ञान' आणि 'साधना' या दोन्हीही रूक्ष आणि काव्यदुष्ट रचना.

श्री. देशपांडे यांच्या वैचारिकतेची ही लकब म्हणावी तर त्यातून काही सापडत नाही. नाहीतर पल्लेदार अशा रचनेतूनही आशयाचे बंदिस्त काव्यरूप या कवितांना लाभले असते. पण तोच-तो-पणा आणि पाल्हाळ यांमुळे या रचना सामर्थ्यशून्य आणि कंटाळवाण्या झाल्या आहेत.

'आत्महत्या' कवितेत कवीने वेगळा धागा धरलेला दिसतो. मृत्यूची जी वाट पाहिली जाते ती अटळपणाच्या भावनेतून अनिच्छेने. पण 'आत्महत्या' हा आपणच सामोरे जाण्याचा मार्ग त्यांनी सूचित केला आहे. पण मार्ग आणि त्याची कार्यवाही या रस्सीखेचीत पुन्हा उभारलेले मन कोलमडून पडते. हा व्यवहार की व्यभिचार, या प्रश्नाने कधी गोंधळात पडतो. डागाळलेले गुन्हेगार आयुष्यही सुपूर्द करताना डळमळणाऱ्या निश्चयाचा श्री. देशपांडे प्रभावी पद्धतीने पाठपुरावा करतात. किंवा मृत्यूकडे गेल्यावर आपण कसे वागायचे याही संभ्रमात अधीच भयव्याकूळ झालेले मन पायात वेडया घालते. द्विधा अवस्थेचेच नामकरण कवीने 'अल्पबुद्धी' असे केले आहे आणि मृत्यूची महानता पुन्हा मनावर ठसविण्यासाठी खालील ओळी आल्या आहेत–

'कदाचित माझी अल्पबुद्धि
तुझ्यावर अन्याय करीत असेल
तुला उगाच नावे ठेऊन ?'

'भास मला होतो' हे एक चांगले मुक्त गीत आहे. विश्वातील 'जे रम्य ते बघून' वेड लागण्याची, सौंदर्याच्या दिव्यदर्शनाने मोहरून निघण्याची, पारंपरिक प्रक्रिया कवीने येथे नाकारली आहे. रम्य धुके त्यांना भेसूर भासमान होते, शिरशिरविणारी गुलाबी थंडी त्यांना दाहक वाटते, कोवळया सूर्यकिरणात मलूल मरत्या तेजाची

आठवण होते. खळखळणारे धुंद जीवन शांत शांत अंताचे स्मरण करून देते. हे विचित्र स्वप्न हे उलटी खण दाखविणारे मन कवीला आवरता येत नाही आणि कवितेच्या शेवटी आपली अगतिकता तो प्रामाणिकपण शब्दांकित करतो.

‘ का असला हा भलता सलता
धगधगता
भास मला होतो...भास मला होतो...’

श्री. देशपांडे यांनी एकच एक विषय वेगळाल्या दृष्टीकोनांनी व भावच्छटांनी शब्दबद्ध केला आहे. चिरपरिचित असलेल्या शब्दांचे, विचारांचे, कल्पनांचे, भावबंधाचे ऋण नाकारल्याचा दावाही त्यांनी केला नाही. चांगली छपाई आणि प्रत्ययकारक रेखाटनांची या पुस्तकाला जोड लाभली आहे. पण काही कविता सोडल्या तर पुनरुक्ती, पाल्हाळ यांची बोचरी धार आपल्या आस्वादशक्तीला बोथट बनविते. या मृत्युगीतांनी भयभावनेच्या लाटा मनात उमटत नाहीत की मन विषण्ण बनत नाही आणि हे कवीचे अपयश आहे. प्रभावी तत्त्वचिंतक पण अपेशी कवी असे मृत्युगीताबद्दल सूत्ररूपाने सांगता येईल. ◻

**मृत्युगीत** : मधुकर गोविंद देशपांडे : मृत्युंजय प्रकाशन : किंमत ८ रुपये.

---


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०



# एका भाऊसाहेबांची कहाणी

सादरकर्ते : पन्नालाल सुराणा



श्रीमंत भाऊसाहेब



श्रीमती प्रभाताई

निवडणुकांचा मोसम लवकरच सुरू होईल.
लोकशाहीचे नगारे वाजू लागतील.
या लोकशाहीत ' लोक ' कुठे आहेत ?
का लोकांच्या नावावर काही गुंडच सत्ता आणि संपत्ती
बळकावून बसलेले आहेत ?
अशा गुंडांना हटवायचे कसे ? ' गरिबी हटाव '
' गुंड हटाव 'पूर्वी शक्य आहे काय ?
लोकशाहीला लागलेले हे गुंडशाहीचे ग्रहण
सुटणार कसे आणि केव्हा ?
हे सुटणार नसेल तर आपल्या लोकशाहीचा अर्थ काय ?
तिचे भवितव्य कोणते ?
' एका भाऊसाहेबांची कहाणी ' या दृष्टीने
डोळे उघडणारी आहे.
निवडणुका ऐन तोंडावर आलेल्या आहेत.
म्हणून ती सादर होण्यात विशेष औचित्य आहे.

# जयशंकर गिरणी

□ □ □ □ □ □ □ □

सकाळी नऊ साडे नऊचा सुमार. एक व्यापारी आपल्या साळीच्या कारखान्याच्या आवारात बसलेला होता. अकस्मात एक गोळी सूं सूं करीत आली आणि पाठीमागून त्याच्या बरगडीत घुसली. भळा भळा रक्त वाहू लागले. तो बेशुद्धच पडला. लोकांनी त्याला दवाखान्यात नेले. प्राथमिक उपचार करून सोलापूरला हलविले. वेळेवर उपचार झाल्याने सुदैवाने तो बचावला.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आली, जयशंकर गिरणीच्या आवारातून बंदूकीची एक गोळी उडाली.. ती लागून एक पक्षी घायाळ झाला......एवढेच. गोळी कोणी उडविली, का उडवली काही तपशील नाही. दोन दिवसांनंतर माझ्याकडे एक बिनसहीचे पत्र आले "जयशंकर गिरणीत कुत्र्याला मारण्याचा खटाटोप चालला होता. मालकांचे आपापसातही काही भांडण झाले होते. गोळी त्या गडबडीत उडाली. व्यापाऱ्याला लागली. याची चौकशी झाली पाहिजे." पत्र घेऊन मी पोलीस स्टेशनवर गेलो. फौजदारसाहेबांना विचारले, "ही गोळीची काय भानगड आहे."

"हो, त्याची चौकशी चालू आहे. पण विशेष काही नाही."

"गोळी ज्या दिशेने आली त्या बाजूला बंदुकीचे परवाने कोणाकोणाकडे आहेत, त्यांपैकी कोणाच्या बंदुकीतून गोळी उडाली याची चौकशी आतापर्यंत व्हायला हरकत नव्हती. मला आज हे पत्र मिळाले आहे..."

"बघू बघू..." फौजदारसाहेबांनी पत्र हिसकावून घेतले. घाई घाईने परत म्हणाले, "मी सगळी चौकशी करतो. तुम्ही निर्धास्त रहा."

चार दिवसांनी परत विचारले. तेव्हा उत्तर मिळाले, "तपास चालू आहे. तुमच्याकडे आलेले पत्र वरिष्ठांकडे पाठवीत आहे."

महिन्यानंतर विचारले तरी तपास चालूच होता. जयशंकर मधील परवाने धारकांच्या बंदुका तपासल्या गेल्या नाहीत, की त्यांचे जाबजबाबही घेतले गेले नाहीत. अशा कामासाठी जयशंकर गिरणीत जायचे कसे, असा पेच त्या फौजदाराला पडलेला होता. १९६५ सालची ही गोष्ट.

तो व्यापारी बिचारा बार्शी सोडून लातूरला आपल्या नातेवाईकांकडे जाऊन राहिला.

बार्शी या छोटेखानी तालुक्याच्या गावी सुताच्या तीन गिरण्या आहेत. त्यांपैकी ही एक. सुमारे नऊशे मजूर काम करत असत. दुसरे महायुद्ध चालू असताना या गिरणीनेही बराच नफा कमावला होता. युद्ध संपल्यावर तोटा सुरू झाला. इतर

अनेक कापड गिरण्यांप्रमाणे या गिरणीचे रडगाणे होते, की मजुरांचे पगार वाढले, खर्च वाढला, नुकसान होते आहे. नुकसान होत असले, तरी गेस्ट हाऊसच्या नावाखाली होणारा हजारो रुपयांचा खर्च चालूच असायचा. १९५२ साली गिरणीचे मॅनेजिंग एजंट श्री. काकासाहेब झाडबुके हे काँग्रेसच्या उमेदवारांविरुद्ध निवडणुकीला उभे राहिले. निवडणूकीसाठी बराच खर्च केला. पण पडले. काँग्रेसचा उमेदवारही पडला. शेकापचा निवडून आला. पुढे १९५६ साली शेकाप आमदारही काँग्रेसमध्ये गेले.

१९५७ च्या सुमारास काकासाहेबांकडून त्यांचे पुतणे श्री. भाऊसाहेब यांच्याकडे गिरणीचा कारभार आला. त्यांनी काँग्रेस उमेदवाराला सत्तावनच्या निवडणुकीत मदत केली. त्याला गिरणीच्या संचालक मंडळावरही घेतले. १९६० साली भाऊसाहेब झाडबुकेंनी अधिकृतपणे काँग्रेस प्रवेश केला. १९६१ सालच्या महाबळेश्वर शिबिराच्यावेळी श्री. यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्या खांद्यावर हात टाकून दोन गोष्टी केल्या होत्या म्हणे.

प्रभाताई या भाऊसाहेबांच्या पत्नी. सुशिक्षित पदवीधर. घरी वेळ जाईना म्हणून काही काळ एका हायस्कूलमध्ये विना वेतन काम केले. मग नगरपालिका निवडणुकीत भाग घेतला. स्कूल बोर्डाच्या चेअरमन झाल्या. १९६१ साली मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण बार्शीला यायचे होते. त्यांना थैली देण्यासाठी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्री. नामदेवराव जगताप यांनी निधी उभारला. श्री. भाऊसाहेब झाडबुकेंनी रु. ५००० दिले. जयशंकर गिरणीच्या हिशोबात खर्ची टाकले. (त्या वर्षीच्या ताळेबंदात गिरणीने रु. ६,३१,६३९ चा तोटा दाखवला होता तरी.) विधानसभेचे तिकीट प्रभाताईंना मिळाले. जयशंकर गिरणीच्या आवारात जेवणावळी करून आणि गिरणीच्याच खर्चाने मोटारी उडवून बाई प्रचंड बहुमताने निवडून आल्या.

## कामगारांचा महागाईभत्ता आणि प्रॉव्हिडंट फंड

गिरणी तोटयात चालत होती. म्हणून केंद्रीय वेतन मंडळाच्या शिफारशी या गिरणीला लागू करू नयेत अशी चालकांनी मागणी केली. केंद्र सरकारच्या मजरखात्याने म्हणे ती मान्यही केली होती. त्या सुमारास काँग्रेसपक्षाचेच दुसरे एक आमदार कामगारांच्या प्रश्नात लक्ष घालीत होते. बार्शीच्या राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे ते अध्यक्ष होते. मुंबईच्या रा. मि. म. संघाचे नेते श्री. वसंतराव होशिंग यांच्या साहाय्याने त्यांनी जयशंकरच्या कामगारांना न्याय मिळवून देण्याचा चंग बांधला. पत्रव्यवहार वाटाघाटी सुरू झाल्या. दीर्घकाळ वाटाघाटी चालून अखेरीस ता. १३-६-१९६३ रोजी मालक व कामगार प्रतिनिधींच्या दरम्यान करार झाला. त्यानुसार (१) महागाई भत्ता दररोज रु. २-१२ या दराने ता. १ जुलै १९६३ पासून देण्याचे, (२) १९६० ते १९६३ या काळात जो महागाई भत्ता कमी दिला गेला ती थकबाकी हप्त्या हप्त्यांनी कामगारांना देण्याचे व १-१०-६४ पासून दर-

साल एक लाखाचा हप्ता देण्याचे (एकूण थकबाकी दहा लाखाची होती) व (३) सोलापूर येथील महागाई भत्याच्या ७५% महागाईभत्ता ता. १-१०-६४ पासून देण्याचे श्री. झाडबुकेंनी कबूल केले. हे सगळे सद्भावनेपोटी (out of good will) ! आणि कामगार संघटनेने काय मान्य केले ? तर (१) बोनस मागणार नाही, (२) १३० कामगारांना काढून टाकायला संमती, (३) रिंग फ्रेम खात्यात १४ नंबर सुतासाठी एका कामगाराने साच्याच्या दोन्ही बाजूने काम करणे, (४) २६ पेक्षा अधिक नंबरही सुतासाठी कामगारांनी चार साचे चालविणे.

या करारावर श्री. झाडबुके व रा. गि. का. संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. साक्षीदार म्हणून श्री. वसंतराव होशिंग व लेबर कमिशनर श्री. डी. जी. काळे यांच्या सह्या आहेत.

कामगारांनी मान्य केलेल्या अटींची अंमलबजावणी तात्काळ सुरू झाली. शेकडो कामगार बेकार झाले. दरम्यानच्या काळात कामगारांच्या प्रश्नात भाग घेण्याऱ्या काँग्रेस आमदारावर एके दिवशी सायंकाळी भर रस्त्यात हल्ला झाला. त्याचे प्राण वाचले पण धैर्य खचले. कामगार संघाशी असलेला संबंध त्याने तोडून टाकला. महागाई भत्ता २ रु. २ आणे असा देण्याचे सुरू झाले पण सोलापूरच्या ७५% दराने देण्याचे व मागील थकबाकी देण्याचे श्री. झाडबुक्यांनी नाकारले. राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे कार्यकर्ते श्री. झाडबुक्यांच्या पूर्णपणे आहारी गेले होते. समाजवाद्यांच्या नेतृत्वाखाली मिलमजदूर सभा कामगारांच्या प्रश्नांचा पिच्छा पुरवू लागली. १३-६-१९६३ च्या कराराची अंमलबजावणी करा असा तगादा मिलमजदूर सभेने लावला. तेव्हा श्री. झाडबुक्यांनी उत्तर दिले, 'तो करार रजिस्टर न झाल्याने आमच्यावर बंधनकारक नाही.' राज्य सरकारचे मजूर खातेही या बाबत गिरणी कामगारांना न्याय द्यायला असमर्थ ठरले.

पुढे सर्वश्री कृष्णा दिगंबर रांजणकर वगैरे दहा कामगारांनी १९६८ साली कोल्हापूर येथील मजूर न्यायालयात दावे दाखल केले. महागाई भत्त्यातील फरकाची १९६० सालापासूनची थकबाकी मिळावी अशी त्यांची मागणी होती. न्यायालयाने ती मागणी न्याय्य असल्याचा निकाल ता. १४–५–१९७० रोजी दिला. (या हुकूमनाम्यातील रकमेची वसुली करण्यात कसकशा बाधा आल्या त्याचे वर्णन पुढे येईल.)

१९६० सालापासून कामगारांच्या प्रॉ. फंडाची रक्कम सरकारकडे भरण्याबाबत श्री. झाडबुक्यांनी टाळाटाळ चालविली होती. उपरोक्त करारात असेही एक कलम घालण्यात आले होते, की गिरणी प्रॉ. फंडाच्या रकमा यापुढे थकविणार नाही आणि मागील थकबाकी हप्त्याहप्त्याने दिली जाईल. श्री. झाडबुके यांनी प्रॉ.फंडाची थकबाकी तर दिली नाहीच पण चालू रकमाही सरकारकडे भरल्या नाहीत. त्यावेळी सुमारे साडेसहा लाखांची थकबाकी होती. म्हणून रीजनल प्रॉ. फंड कमिशनरांच्या सूचनेवरून राज्य सरकारने १९६६ च्या जुलै व ऑक्टोबर महिन्यांत मुंबई येथील

कोर्टात श्री. झाडबुके वगैरच्यावर खटले भरले. (प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट २३ वे कोर्ट, एस्प्लनेड् मुंबई, क्रि. के. नं. ९३३ ते ९३८) पुढे १९६७ च्या निवडणुकीनंतर सदरचे खटले सरकारने काढून टाकले. गिरणी मालकांनी दरमहा ३०,००० रुपयांचा हप्ता भरण्याचे कबूल केले आहे म्हणून खटले काढण्याची तडजोड केली असे राज्य सरकारने सांगितले. मे, १९६७ मध्ये प्रॉ. फंडाची थकबाकी रुपये ७,६२,८१० होती. नंतरच्या काळात गिरणीने काही हप्ते भरले. पण १९६९ मध्ये एकही हप्ता भरला नाही. 'यांनी तडजोडीच्या अटी मोडल्या आहेत, तुम्ही यांच्यावर खटले का भरत नाही' अशी मिलमजदूर सभेने राज्य सरकारकडे विचारणा केली असताना मजूर मंत्र्यांनी उत्तर दिले, 'खटले भरून पैसे थोडेच वसूल होणार आहेत ? शिवाय गिरणी बंद पडण्याचा धोका पत्करायला आम्ही तयार नाही. कामगारांना विनाकारण बेकार का करायचे ?' श्री. श. का. आठल्ये गुरुजी व डॉ. बापू काळदाते यांनी विधानसभेत या प्रश्नाचा सतत पिच्छा पुरविल्यामुळे सरकारने नाइलाजाने जयशंकर गिरणीवर जप्ती नेण्याचे ठरविले. कारण सरकारचीही बरीच थकबाकी या गिरणीकडे आहे असे त्यांच्या लक्षात आले होते. ता. २–९–१९७० रोजी जयशंकर गिरणीकडे पुढीलप्रमाणे थकबाक्या होत्या, त्या जमीन महसूलच्या थकबाक्या समजून वसूल करण्याचे सरकारने ठरविले–

| | |
|---|---|
| १ : प्रॉ. फंड थकबाकी | ५,७०,४०७–६५ |
| २ : इलेक्ट्रिक सिटी थकबाकी | १६,०२२–६८ |
| ३ : एम्प्लॉईज् स्टेट इन्शुअरन्स | ५६,९६४–०० |
| ४ : सेल्स टॅक्स थकबाकी | ७,६७,९१७–०६ |
| | १४,१०,४११–४९ |

याशिवाय इतर बोजे सुमारे २६ लाखांचे होते. म्हणून सदर गिरणी रु. ४० लाखांना विकली जावी अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आणि तीन वेळेला लिलावाच्या तारखा ठरविल्या. प्रत्येक वेळेला वर्तमानपत्रात जाहिराती वगैरे देण्याचा खर्च सुमारे २७ हजार रुपये होत होता. एकाही वेळी लिलाव मागायला कोणी आले नाही आणि २८ जानेवारी १९७१ ला मुंबई हायकोर्टाने सदर लिलाव स्थगित करण्याचा हुकूम दिला. त्याचे कारण पुढे येईलच.

प्रॉव्हिडंट फंडाबाबत कायद्याची तरतूद अशी आहे, की कामगारांच्या पगारातून कापलेली रक्कम मालकांनी सरकारकडे भरावयाची; आणि सोबत स्वतःचीही वर्गणी (employers' share) भरावयाची. कामगार निवृत्त झाल्यानंतर त्याला ही सर्व रक्कम द्यायला सरकार बांधलेले आहे. मालकाने प्रॉ. फंडाची रक्कम सरकारकडे भरली की नाही हे पाहण्याचे काम सर्वस्वी सरकारचे आहे. याबाबत संबंधित कामगारालासुद्धा परस्पर न्यायालयाकडे जाता येत नाही. त्याच्या भविष्यनिधीचे सर्व भवितव्य सरकारच्या दक्षतेवर अवलंबून आहे. आणि म्हणूनच मालकांनी

प्रॉ. फं. ची रक्कम भरण्यात टाळाटाळ केली तर त्याबाबत अनेक प्रकारांनी कारवाई करण्याचे अधिकार सरकारला आहेत. उदाहरणार्थ १ : जमीनमहसुलाची थकबाकी समजून प्रॉ. फं. ची थकबाकी वसूल करणे, त्यासाठी न्यायालयात न जाता एकदम गिरणीवर जप्ती नेणे, २ : गिरणीमालक-संचालक वगैरेंच्या खाजगी संपत्तीवर जप्ती नेणे, ३ : त्यांच्यावर प्रॉ. फं. कायद्याखाली खटले भरणे-ज्यात एक वर्षापर्यंतची शिक्षा होऊ शकते. ४ : इंडियन पीनल कोडखाली विश्वासघात, फसवणूक वगैरे आरोपांबाबत खटले भरणे.

महाराष्ट्र सरकारने इतर काही गिरण्यांवर खटले भरले. मुंबईच्या धनराज गिरणीच्या मालकांना अशाच एका खटल्यात चांगलीच शिक्षा झाली. पण जयशंकर गिरणीच्या संचालकांवर असे खटले एकदा भरले, ते काढून घेतले गेले व परत भरले नाहीत. वास्तविक प्रॉ. फं. कमिशनरने महाराष्ट्र सरकारला तशा सूचना १९७० च्या फेब्रुवारीत केल्या होत्या. पण सरकारने त्याबाबत हालचाल केली नाही. गिरणीच्या संचालकांच्या खाजगी संपत्तीवर जप्ती नेण्याची तरतूद आहे हे तर म्हणे सरकारच्या लवकर लक्षातच आले नाही. १९७१ च्या जुलै-ऑगस्टमध्ये याबाबत मिल मजदूर सभेने फारच पिच्छा पुरविला, तेव्हा कोठे हालचाल सुरू झाली. पण श्री. झाडबुकेंनी स्वतःच्या नावावर फारच थोडी जायदाद ठेवल्याने सरकारच्या हाती काय पडेल याची शंकाच आहे.

## एन्. आय. डी. सी. चे कर्ज

१९६० साली काँग्रेस-प्रवेश केल्याबरोबर आपली गिरणी नफ्यात चालावी यासाठी सरकारी संस्थांकडून कर्जे मिळविण्याचा प्रयत्न श्री. झाडबुक्यांनी चिकाटीने चालविला. नॅशनल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या भारत सरकारच्या वित्त संस्थेने जयशंकर गिरणीला १९६३-६४ साली रुपये ९,९५,००० चे कर्ज दिले व त्यासाठी गिरणीच्या इमारती व यंत्रसामग्री गहाण ठेवून घेतली. त्यासाली गिरणीला किरकोळ देणी रुपये ४,६७,९५६ ची होती. किरकोळ देण्यांचा आकडा १९६४-६५ साली रुपये ६,४८,२११ पर्यंत वाढला आणि १९६५-६६ साली रुपये ३४,७०,२२४ ची मजल त्या रकमेने गाठली. ३४ लाखांची देणी ही सगळी 'किरकोळ' म्हणून दाखविली आहेत. कर्जदारांची नावे जाणूनबुजून लपविली आहेत. कंपन्यांचे ताळेबंद काळजीपूर्वक पाहण्याचे ज्यांचे कायद्यानुसार कर्तव्य आहे त्या 'रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्'ने जयशंकर गिरणीच्या ताळेबंदातील या लपवाछपवीकडे का दुर्लक्ष केले हे समजत नाही.

एन्. आय. डी. सी. चे वर्तनही असेच चमत्कारिक आहे. जयशंकर गिरणीने दि बार्शी मर्चंटस् को ऑप. बँकेला 'इमारती व यंत्रसामग्री' गहाण ठेवून त्यांच्याकडून दहा लाखाचे कर्ज मिळविले आहे. आणि ते गिरणीच्या ताळेबंदात दाखवलेले नाही. त्यामुळे तुमच्या हितसंबंधांना धक्का पोचेल की काय हे वेळेवरच पहावे

म्हणून एन. आय. डी. सीं. ला १९६७ च्या एप्रिलमध्ये आम्ही पत्र पाठवले होते. १९७१ च्या जानेवारीपर्यंत त्यांनी काहीही हालचाल केलेली दिसत नाही. प्रॉ. फंड व इतर सरकारी थकबाकी वसुलीसाठी जेव्हा सरकारने जयशंकर गिरणी लिलावात काढली तेव्हा कोठे एन्. आय. डी. सी. ला जाग आली. त्यांनी आपल्या कर्जवसुलीसाठी मुंबई हायकोर्टात जयशंकरवर दावा लावला आणि लिलाव स्थगित करण्याची मागणी केली. हायकोर्टाने ती मान्य करून स्थगिती हुकूम दिला. त्यामुळे प्रॉ. फंड व इतर सरकारी थकबाकी वसूल करण्याचे काम तर खोळंबलेच. पण विशेष म्हणजे वर उल्लेखिलेल्या सर्वश्री रांजणकर वगैरे दहा कामगारांनाही आपल्या रकमेला मुकावे लागत आहे. कारण त्यांनी कोल्हापूर येथील मजूर न्यायालयात दावा करून १९७२ साली महागाईभत्त्यातील फरकाच्या थकबाकीचा जो रु. ७१०० चा हुकूमनामा मिळविला त्याची अंमलबजावणी सरकारच्या महसूल खात्यामार्फत करावयाची होती. कोल्हापूरच्या मजूर न्यायालयाचा हुकूमनामा पुणे येथील डेप्युटी लेबर कमिशनर यांच्यामार्फत पुणे कलेक्टरांच्या द्वारे सोलापूर कलेक्टरांना व तेथून बार्शी तहसीलदाराला पोचायला सहा-सात महिने लागले. मग तहसीलदारांनी त्या हुकूमनाम्याच्या रकमेचा अंतर्भाव जयशंकरकडील थकबाकीच्या यादीत केला. तोपर्यंत मुंबई हायकोर्टाकडून लिलावाच्या स्थगितीचा हुकूम आला.

म्हणून सर्वश्री रांजणकर वगैरेंनी हायकोर्टाकडे साधा अर्ज करून आपली येणे बाकीची रक्कम फार लहान असल्याने जयशंकरच्या चालू व्यवहारातून ती देण्याचा हुकूम व्हावा अशी विनंती केली. पण तो अर्ज रीतसर नसल्याने हायकोर्टाच्या अधिकाऱ्यांनी कळविले, की ' रीतसर अर्ज करा. ' त्यासाठी किमान तीन-चारशे रुपये खर्च आहे. तो करण्याची कुवत नसल्याने सदर कामगार आपल्या रकमेचा मालकांकडून होत असलेला अपहार उघडचा डोळ्यांनी पाहात आहेत. साक्षीला कोल्हापूर मजूर न्यायालयाचा हुकूमनामा आहेच. जो आता धूळ खात पडला आहे.

दरम्यानच्या काळात एन. आय. डी. सी. हजारो रुपये खर्चून दावा चालवीत आहे. जयशंकर गिरणीही (कामगार+सरकार+एन. आय. डी. सी.+बार्शी मर्चंटस् बँक यांचे लुबाडलेले) पैसे खर्च करून दावा लढवीत आहे. हायकोर्टाने जयशंकर गिरणी रिसीव्हरच्या ताब्यात दिली आहे आणि ' जमानत न घेता व कमिशन न घेण्याच्या बोलीवर श्री. भाऊसाहेब झाडबुकेंनाच एजंट नेमावे ' असे रिसीव्हरना सुचविले आहे. त्यामुळे जयशंकरचे गेस्टहाऊस राजकारणासाठी वापरायला व तेथील कामगार घारीपुरीच्या शेतावर राबवायला भाऊसाहेब सुरक्षित आहेत. सरकारी थकबाक्या व एन. आय. डी. सी. चे कर्ज वसूल होण्याइतकी रक्कम जयशंकर विकून येईल की नाही हे एक परमेश्वरालाच माहीत !

## बार्शी मर्चंटस् बँकेचे देणे

१९६५ साली श्री. भाऊसाहेब झाडबुके यांनी पुढाकार घेऊन बार्शी मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली, तेच तिचे अध्यक्ष झाले. त्यांनी जयशंकर गिरणीलाही सदर बँकेचे भागधारक बनविले. वास्तविक सहकारी सोसायटीच्या कायद्यानुसार कुठल्याही जॉइंट स्टॉक कंपनीला सहकारी संस्थेचे भागधारक बनता येत नाही. माजी सहकार मंत्री कै. विनायक पाटील यांनी विधानसभेत तशी कबुली दिली होती. पण पुढे श्री. झाडबुक्यांनी श्री. विनायकरावांना बार्शीला बोलावून जयशंकर गिरणीत मोठ्या थाटाची मेजवानी दिली. त्यामुळे सहकारी कायद्याचा भंग क्षम्य ठरलेला दिसतो. असो.

बार्शी मर्चंटस् बँकेने जयशंकर गिरणीला चालू मालसाठा व फर्निचर यांच्या तारणावर रुपये १,१०,००० चे कर्ज ता. २८–७–६५ रोजी मंजूर केले. पुढे सदर बँकेने गिरणीला ता. २०–३–१९६६ रोजी रु. १०,००,००० चे आणखी एक कर्ज मंजूर केले. त्यासाठी गिरणीच्या इमारती व यंत्रसामग्रीचे गहाणखत ता. २६–४–१९६६ रोजी बार्शीला नोंदवून घेतले. या मंजूर कर्जापैकी गिरणीने प्रत्यक्षात रुपये ८,६२,७७५ उचलले. गिरणीने एन. आय. डी. सी. ला आपल्या इमारती व यंत्रसामुग्री १९६४ साली गहाण टाकल्या होत्या. त्याच इमारती व यंत्रसामग्री दोन वर्षांनंतर बार्शी मर्चंटस् बँकेला गहाण टाकण्यात आल्या असे दिसते. ही लबाडी लपविण्यासाठीच जयशंकर गिरणीच्या १९६५–६६ च्या ताळेबंदात बार्शी मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेचा कर्जदार म्हणून निर्देश न करता किरकोळ देणी रु. ३४,७०,००० ची दाखविली गेली आहेत. एवढी मोठी रक्कम जयशंकर गिरणीने आपल्या ताळेबंदात का दाखविली नाही असा प्रश्न महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्यानेही विचारलेला दिसत नाही. बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेच्या ताळेबंदातही अशी लपवाछपवी आहे. जयशंकर गिरणीकडील येण्याचा स्पष्ट उल्लेख न करता त्या ताळेबंदात म्हटले आहे, 'ज्या कंपनीत संचालकांचे हितसंबंध आहेत अशा कंपनीकडून येणे (पूर्णतया सुरक्षित) रुपये १०,९०,६१४=४६ !'

या सर्व प्रकरणात श्री. भाऊसाहेब झाडबुके यांनी १ : जयशंकर गिरणीची एकच मालमत्ता एन. आय. डी. सी. व बार्शी मर्चंट्स को ऑप. बँक या दोन संस्थांना गहाण टाकली, २ : एन. आय. डी. सी. ला दिलेल्या वचनांचा भंग केला व त्यांची रक्कम धोक्यात आणली, ३ : बार्शी मर्चंट्स बँकेची रक्कम धोक्यात आणली, ४ : दिशाभूल करणारे कागदपत्र तयार केले. इंडियन पिनलकोड प्रमाणे हे सर्व गंभीर स्वरूपाचे अपराध आहेत. पण जो गुन्हेगार धनिक आहे व विशेषत: आपल्या पक्षाचा आहे त्याला शासन करायचे नाही, त्याच्या सर्व पापांवर पांघरूण घालायचे हे महाराष्ट्र सरकारचे ब्रीद तर नाही ना ?

## बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेचे दिवाळे

१९६५ साली स्थापन केलेल्या या सहकारी बँकेचा व्यवहार अध्यक्ष या नात्याने श्री. भाऊसाहेब झाडबुके यांनी तीनसाडेतीन वर्षे पाहिला. त्यावेळी सोलापूर जिल्हा सहकारी बँकेत श्री. नामदेवराव जगतापांचे वर्चस्व होते. त्यांच्या मेहेरबानीने भाऊसाहेबांनी बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेसाठी सुमारे रु. २९ लाखाची कर्जे मिळविली. त्यातील एक तृतीयांश तर जयशंकर गिरणीसाठीच वापरली. बाकीची रक्कम शहरातील आपल्या बगलबच्च्यांना व निकटच्या व्यापारी मित्रांना कर्जाऊ दिली. गुदाम तारणावर कर्जे देण्याची प्रथा असतेच. बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेने अनेक गुदामांच्या तारणावर व्यापाऱ्यांना कर्जे दिली. ऑडिटरांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे की, 'यांपैकी बरीच गुदामे जयशंकर गिरणीच्या आवारात असून त्यांच्या किल्ल्याही गिरणीतच आहेत असे सांगण्यात आले. त्यामुळे त्यात माल आहे की नाही हे तपासता आले नाही. श्री. सी. एम. त्रिवेदी या नावाच्या एका व्यापाऱ्याला गुदाम-तारणावर कर्ज दिल्याचे जमाखर्चाच्या वह्यांवरून दिसून येते. पण सदर व्यापारी बार्शीत कोणालाही माहीत नाही !'

अशा अनेक व्यवहारांमुळे बार्शी मर्चंटस् बँक डबघाईला आली. तेव्हा भाऊसाहेबांनी अध्यक्षपद सोडून दिले व एका व्यापाऱ्याला त्या जागी बसवले. वरही खांदेपालट झाला होता. नामदेवरावांची सद्दी संपली होती. काही काळ श्री. पर्वतसाहेबांनी मॅनेजर म्हणून जि. म. स. बँकेवर अधिराज्य गाजवले. १९६७ च्या निवडणुकीत उमेदवार म्हणून शिरल्यावर बँकेतून त्यांना अर्धचंद्र मिळाला. श्री. शंकरराव मोहिते-पाटलांची कारकीर्द सुरू झाली. त्यांनी बार्शी मर्चंटस् को-ऑप. बँकेबाबत कडक कारवाई सुरू केली. बँक दिवाळ्यात काढून प्रशासक नेमला. तो मागील देणी वसूल करण्याच्या उद्योगात आहे. पण भाऊसाहेबांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्याबाबत कारवाई करण्याचे जि. म. सहकारी बँक टाळीत आहे. आणि सहकारमंत्री श्री. मोहितेही तसे काही करण्याच्या विचारात दिसत नाहीत. त्यांच्या काँग्रेसी मार्क्सवादात हे बसत नसावे.

## इतर सहकारीसंस्था

'विना सहकार नही उद्धार' या घोषवाक्याची महती पटल्यामुळे भाऊसाहेबांनी अनेक सहकारी संस्थात भाग घेतला. जयशंकर गिरणीकामगारांच्या सहकारी सोसायटीचे ते अध्यक्ष होते. सदर सोसायटीचे सुमारे रु. ९५,००० जयशंकर गिरणीत जमा होते. ते त्या सोसायटीला परत मिळाले नाहीत. बार्शी भागात केळ्याची पावडर करण्याचा कारखाना काढण्यासाठी एक विविध प्रक्रिया सहकारी सोसायटी स्थापन करण्यात आली होती. (केळी बहुधा खानदेशातून आणायची कल्पना असावी, कारण बार्शी भागात केळी पिकत नाहीत.) त्यासाठी जमलेले काही हजारांचे भागभांडवल भाऊसाहेबांच्या खिशात गेले; आणि ती सोसायटी हवेतच विरली.

१९६२ सालच्या चिनी आक्रमणानंतर ग्राहक सहकारी भांडारे ठिकठिकाणी स्थापन झाली. बार्शी हे मोठे शहर असल्याने येथेही स्वतंत्र भांडार स्थापन करण्याची कल्पना भाऊसाहेबांनी काढली. भाग-मांडवल जमवण्याची मोहीम सुरू झाली. नगरपालिकेचे शिक्षक व अन्य नोकरवर्ग यांना जबरदस्तीने भाग खरेदी करायला लावले. त्यांच्या मतांच्या जोरावर भाऊसाहेब सहकारी ग्राहक भांडाराचे अध्यक्ष झाले. चारपाच वर्षांत त्या भांडाराला दोन लाखांचा तोटा आला. त्यापैकी एक लाख तर जयशंकर गिरणीच्या कँटीनकडेच अडकले होते. तोटा वाढू लागल्याबरोबर भाऊसाहेबांनी अध्यक्षपद सोडले आणि शहर काँग्रेसकमिटीचे अध्यक्ष व नगरपालिकेच्या शिक्षण समितीचे चेअरमन श्री. बाबासाहेब महेदवी यांना त्या जागी बसविले. त्यांनी जयशंकरकडील थकबाकी वसूल करण्यासाठी काहीही प्रयत्न केला नाही. पण प्रॉ. फंड व इतर थकबाक्यांसाठी कलेक्टरांनी जेव्हा ती गिरणी लिलावात काढली तेव्हा बाबासाहेबांनी कलेक्टरांना पत्र लिहिले –' आमच्या सहकारी ग्राहक भांडाराची जयशंकर गिरणीकडे एकलाखाची येणे बाकी आहे. तरी जो कोणी लिलाव घेईल त्याला या बोजाची जाणीव करून द्यावी. ।'

## नगरपालिकेतील महाभारत

¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤

जयशंकर गिरणी, बार्शी मर्चंटस् को-ऑप. बँक वगैरे संस्थांतील गोंधळ चालू असतानाच १९६७ च्या विधानसभा निवडणुका आल्या. श्रीमती प्रभाताई झाडबुकेंनी ' श्री. नामदेवराव जगताप हे माझे राजकीय गुरू आहेत ' अशी घोषणा करून निवडणूक-प्रचाराचा नारळ फोडला. भाऊसाहेबांनी येन केन प्रकारेण ती निवडणूक जिंकली. प्रभाताईंची उपमंत्रिपदी तरी वर्णी लागावी असा कसून प्रयत्न झाला. यात यश आले नाही, तेव्हा भाऊसाहेबांनी स्वतःच बार्शी नगरपालिकेत पदार्पण केले. एकदम पाच वर्षांसाठी नगराध्यक्षपद स्वतःकडे घेतले. आणि तेथे एक महाभारत घडविले. त्याची एका नगरसेवकानेच सांगितलेली कथा पुढीलप्रमाणे––

' ऑक्टोबर १९७१ रोजी सकाळी ११ वाजता बार्शी नगरपालिकेची जनरल मीटिंग होती. बार्शी नगरपालिकेचे हल्लीचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब झाडबुके सत्तेचा दुरुपयोग करून अनेक बेकायदेशीर गोष्टी करीत आलेले आहेत. त्यामुळे नगरपालिकेचा पैसा बेजबाबदारपणे व बेकायदेशीरपणे खर्च झालेला आहे. त्या सर्व

बाबींवर सरकारी ऑडिटरने असा शेरा मारला, की बऱ्याच प्रमाणात नगरपालिकेचा पैसा अनाठायी म्यु. पल कायद्याचा भंग करून खर्च केला आहे. तो पैसा नगरपालिकेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्याकडून वसूल करावा. हा विषय नगरपालिकेच्या वरील मीटिंगमध्ये अजेंड्यावर होता व ही चर्चा विरोधी सभासद करणार व आपणास अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडणार अशी नगराध्यक्षांना भीती वाटत होती. शिवाय सभागृहात त्यांच्या बाजूची जी सभासद मंडळी आहेत. त्यातील बऱ्याच जणांना या प्रकरणाची माहिती न व्हावी अशी दक्षता या अध्यक्षांनी आजपर्यंत घेतलेली आहे. म्हणून सदर अध्यक्षांनी त्यांच्या एक-दोन हस्तक सभासदांना, विरोधी सभासदांशी मीटिंग सुरू होण्यापूर्वीच कुरापत काढून भांडण्यास सांगितले. सभागृहात सभासद जमले. अध्यक्ष आले. त्यावेळी विरोधी पक्षाचे एक दोन सभासद सोडून बाकीचे उभे राहिले. अध्यक्ष स्थानापन्न झाल्याबरोबर त्या हस्तकांनी उभे न राहिलेल्या सभासदांवर कारवाई करावी अशी मागणी केली. संबंधित सभासदांनी खुलासा केला, की या सभागृहात अध्यक्षांच्या खुर्चीला आमचा आदर आहेच व आम्ही सदर जागेला आदर दर्शवूनच वागत आलेलो आहोत. परंतु या खुर्चीवर बसलेले अध्यक्ष हे मात्र त्या खुर्चीची इभ्रत राहील असे वागत आलेले नाहीत. केवळ सत्ता हातात रहावी म्हणून अनेक बेकायदेशीर गोष्टी व अनाठायी खर्च त्यांनी या नगरपालिकेत अव्याहतपणे केलेला आहे व अजूनही चालू आहे. या बाबत आपल्या वार्षिक ऑडिटमध्ये ऑडिटरने अनेक खर्चाचे मुद्दे बेकायदेशीर व नुकसानीचे दाखवून त्याची जबाबदारी नगराध्यक्षांवर असून अशाप्रकारे अनाठायी खर्च झालेली आणि काही ठिकाणी अडकून पडलेली रक्कम ही नगराध्यक्षांकडून त्वरित वसूल करावी, असा रिपोर्ट केला आहे व तो आजच या सभेपुढे येणार आहे. त्याशिवाय या नगरपालिकेत बऱ्याच गोष्टी बेकायदेशीरपणाने चाललेल्या आहेत याचीही जाहीर कबुली महाराष्ट्र शासनाच्या जबाबदार मंत्री महोदयांनी विधानसभेच्या नागपूर अधिवेशनात दिलेली आहे. तेव्हा अशा अध्यक्षांना मान द्यावा असे मला मुळीच वाटत नाही. तरी मी अशा अध्यक्षांना मुळीच मान देणार नाही व मी जे वागत आहे तेच या ठिकाणी योग्य आहे.

यावर दुसरे एक विरोधी सभासद उठून बोलू लागले, की या अध्यक्षांनी यापूर्वी गेली चार वर्षे अनेकवेळा विरोधी सभासदांचा सत्तेच्या जोरावर जाणून बुजून अपमान केला. अनेक प्रकारे त्रास दिला. तेव्हा कधी अध्यक्षांना याची जाणीव, अध्यक्ष या नात्याने का झाली नाही ? आज मात्र केवळ त्यांना मान देत नाहीत म्हणून त्यांनी एवढा आरडा-ओरडा का करावा ?

यानंतर बराच गोंधळ घालण्यास या सत्तारूढ सभासदांनी सुरुवात केली व शेवटी या अन्यायी अध्यक्षांचा त्रिवार धिक्कार करून विरोधी सभासदांनी सभात्याग केला व मग त्यांची ही मीटिंग झटपट पार पडली.

१९६७ च्या जूनमध्ये बार्शी नगरपालिकेची निवडणूक झाली. निवडणुकीत कुठल्याही राजकीय पक्षांनी अधिकृतपणे भाग घेऊन निवडणूक लढविली नाही. जे उमेदवार निवडून येण्याची शक्यता होती, त्यांच्यांशी धूर्तपणाने या बार्शी नगर-पालिकेचे अध्यक्ष श्री भाऊसाहेब झाडबुके यांनी परिचय वाढविला व अशाप्रकारे निवडून आलेल्या सभासदांची त्यांनी एकत्र बैठक घेतली. त्यामध्ये एकूण ३० सभा-सदांपैकी जवळजवळ २५ जणांना आपल्या मिलमध्ये जमविले व त्याशिवाय गावातील काही गुंड, काही मोठे व्यापारी यांनाही बोलविले व मोठ्या गोडीने व कामाच्या उत्साहाने त्यांनी व त्यांच्या पाठीराख्यांनी असे भासविले, की आता आपण या बार्शी शहराचा कायापालट करणार आहोत. अनेक योजना अमलात आण. त्याची पूर्तता करू. भाऊसाहेबांच्या पत्नी आमदार आहेतच. शिवाय आपण सत्तारूढ असलेल्या सरकार पक्षाचे. तेव्हा अध्यक्ष म्हणून संपूर्ण ५ वर्षे राहा म्हणून आपण आग्रहाने भाऊसाहेबांना सांगितले पाहिजे. त्यांच्या या ५ वर्षांच्या कार-किर्दीत ते कसा चमत्कार (कामाचा) करून दाखवतील हे आपण पाहून थक्क व्हाल...अशा नाटकी थाटात काही व्यापारी मंडळींनी तेथे भाषणबाजी केली. शहरा-तील मिल मालक, मर्चंट व्यापारी बँकेचे चेअरमन, व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष, बार्शी मध्य. सह. ग्राहक भांडाराचे चेअरमन व जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे डायरेक्टर आणि बार्शी भागातून काँग्रेस तिकिटावर निवडून आलेल्या आमदार बाईंचे पती—असा एवढा लांब शेपटाचा विस्तार असल्यानंतर सर्व वानरात मारुती बनणे हे सोपे होते व त्याप्रमाणे त्यांच्या या गोड बोलण्यावर सर्वांनी विश्वास ठेवून पाच वर्षांसाठी त्यांना अध्यक्षपद दिले. या प्रसंगी त्यांच्या 'मधुघट'वर पार्टी, जेवण, दारू याची अगदी रेलचेल झाली हे सांगणे नलगे.

सत्ता हातात आली आणि प्रथम त्यांनी आपल्या मर्जीनुरूप होयबा म्हणणारे ३ सभासद को—ऑप्ट करून घेतले. को—ऑप्ट म्हणून होणाऱ्या सभासदांना, निवडून आलेल्या सभासदांनी प्रत्यक्ष निवडून द्यावयाचे असते. परंतु या अध्यक्षांनी सर्व सभासदांच्या मतदानाच्या एका फॉर्मवर फक्त सह्या घेतल्या. बाकीचा मजकूर आपल्या मर्जीप्रमाणे भरून निवडणूक केली व म्युनिसिपल कारभारात लोकशाही तत्त्वाचा पहिला मुडदा पाडला. या गोष्टीस कुणीच विरोध अथवा नापसंती दाखविली नाही. तेव्हा त्यांनी पुढील अनेक अनर्थ केले. त्याचा घोर परिणाम काही सभासदांना भोगावा लागत आहे व बार्शी शहरवासियांना भोगावा लागत आहे.

यानंतर म्युनिसिपल स्कूल बोर्डाची निवडणूक जाहीर झाली. त्यातही वरील प्रकार झाला. म्यु. सभासदांनी आपल्या इच्छेप्रमाणे मतदान करून स्कूलबोर्ड सभासद निवडून द्यावयाचे असतात. परंतु तिथेही त्यांनी सर्व सभासदांच्या मतदान-पत्रिका एकत्र करून त्यावर त्यांच्या सह्या घेऊन आपल्या मर्जीनुरूप स्कूलबोर्ड सभासदांची नावे लिहून जाहीर केली. त्यावेळी मात्र काही सभासदांनी थोडी खळ-

खळ केली, नापसंती दाखविली. परंतु त्यांची दखल भाऊसाहेबांनी घेतली नाही व शहरात तर एकप्रकारचे असे वारे वहात होते, की भाऊसाहेब झाडबुके आता नगर-

## बळी तो छळी

दि. १३-५-७१ पासून माझे मुलास (नांव शिरीष शिवाजी वडेकर, वय ८) वांत्या व जुलाब होत होते. म्हणून त्याला दि. १४-५-१९७१ ला सकाळी ८ वाजता नगरपालिकेच्या सरकारी दवाखान्यांत नेले होते. तेथील डॉ. मुसा यांनी माझे मुलास तपासून सिक्विलचे इंजेक्षन देऊन सलाइनची एक बाटली सुरू केली. अंदाजे १० वाजण्याचे सुमारास सरकारी दवाखान्याचे चीफ मेडिकल ऑफिसर डॉ. वखारिया आले व 'वडेकर यांच्या मुलास सलाईन-ची बाटली कुणी लावली' असे त्यांनी विचारल्यावरून विभूते कम्पाऊण्डरने त्यांना सांगितले, की डॉ. मुसा यांनी लावली. त्यावर डॉ. वखारिया असे रागाने बोलू लागले, की हा दवाखाना डॉ. मुसाच्या बापाचा आहे की वडे-करच्या बापाचा आहे. वडेकर यांना बुटाने मारायला हवे. या दवाखान्यात तुम्ही यावयाचे नाही. गावांत दवाखाने नाहीत काय ? डॉ. वखारिया रागाच्या भरात आम्हा पति-पत्नींना अर्वाच्य शिवीगाळ करू लागले व धक्काबुक्की करून त्यांनी माझ्या मुलाच्या हाताला सुरू असलेली सलाइनची बाटली रागाने उपसून काढली. सूई उपसून काढल्यामुळे मुलाच्या शिरेतून रक्त वाहू लागले. तेव्हा मी स्पिरिटचा बोळा मागितला असता तोसुद्धा देऊ दिला नाही. त्यामुळे मी मुलाला तसेच उचलले. माझे कपडे रक्ताने माखले गेले आहेत. बिघडलेल्या प्रकृतीच्या त्या अवस्थेत मी मुलाला डॉ. कश्यपि यांचे दवाखान्यात नेऊन उपचार केले व दुपारी १२ वाजता डॉ. वखारियांचे विरुद्ध बार्शी पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविला. त्याच दिवशी डॉ. वखारिया यांनी सायंकाळी ५ वाजता आमचे विरुद्ध बार्शी पोलीस स्टेश-नला गुन्हा नोंदविला. आम्ही जामीन देत असतानासुद्धा आमचा जामीन न घेता आम्हा दोघा भावांना, मला व अंबऋषी वडेकर (नगरपिते) यांना, डॉ. वखारिया यांचे सांगण्यावरून बार्शी पोलीस खात्याने, लॉकअप्‌मध्य डांबून टाकले. तसेच आमचे वार्डातील म्युनिसिपल नळाचे कनेक्शन तोडून टाकले. तसेच आमची जागा धोकादायक नसतानाही धोकादायक ठरवून ती उतरवून घेणे आम्हास भाग पाडले. आमच्या भागातील नगरपालिकेचे दोन सार्वजनिक नळ बंद करण्यात आले.

[श्री. भाऊसाहेब झाडबुके यांच्या विरोधी भूमिका घेणाऱ्या नगरसेव-काच्या, त्याच्या कुटुंबियाच्या व मतदारांच्या वाट्याला काय येते त्याचा हा एक नमूना – ]

पालिकेत आलेले आहेत, तेव्हा आता नगरपालिका सुधारणार, सुखसोयी वाढणार व आदर्श असे शहर होणार. कारण......

......'पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल हेसुद्धा प्रथम नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणूनच काम पाहू लागले व त्यांनी या देशाचे भले केले......आपले भाऊसाहेब तसेच करणार......' असे त्यांचे भाट म्हणू लागले. गेल्या चार वर्षात झाले मात्र उलटे !

जेव्हा कारभाराला सुरूवात झाली, तेव्हा काही जाणकार, अभ्यासू सभासद या त्यांच्या वागण्याचा, बोलण्याचा सर्व प्रकारे विचार करू लागले. रोजचे रोज नगरपालिकेतील कागदपत्र, प्रोसिडिंग पाहू लागले. त्यांची खात्री पटत चालली, की हे सर्व ढोंग आहे. सुधारणा या नावाखाली स्वाहाकार होऊ लागला आहे. पूर्वीचे अध्यक्ष किंवा सभासद आपल्या किरकोळ स्वार्थाकडे पाहात व अजागळपणाने काम करीत. परंतु हे अध्यक्ष कायद्याचे पदवीधर, व जरा खोलवर विचार करणारे; तेव्हा यांनी कायद्याच्या चौकटीत बसतील व शक्य तो त्वरित दुष्परिणाम दिसणार नाहीत अशी अनेक बेकायदेशीर कृत्ये करण्यास सुरुवात केली.

सदर नगराध्यक्षांनी बार्शीला नेत्रशिबीर आयोजित केले. सरकारी यंत्रणा राबवून, गावातील बऱ्याच व्यापाऱ्यांकडून हजारो रुपये देणगीरूपाने जमवून, वर नगरपालिकेचे रुपये दहा हजार देणगी म्हणून घेऊन हे नेत्रशिबीर भरविले. मात्र नेत्रपिडितांच्या डोळ्यांवर उपचार करण्याऐवजी या सर्व शिबिराच्या व्यासपीठावर राजकीय डाव मांडले. जिल्हाध्यक्ष श्री. नामदेवराव जगताप यांच्याशी नुकतेच पैशावरून मतभेद झालेले होते. शिवाय जिल्हा म. सह. बँकेच्या चेअरमनपदावरून नामदेवराव जगताप गेलेले होते. आपल्या डबघाईला आलेल्या मर्चंट बँकेला तारण्यासाठी नूतन चेअरमन श्री. आमदार शंकरराव मोहितेपाटील मदत करतील, म्हणून यांनी त्यांना या व्यासपीठावर बोलावून नामदेवराव जगतापांवर भरपूर तोंडसुख घेतले व या नेत्रशिबिरात अशाप्रकारे नेत्र-दीपक कामगिरी बजावली. या नेत्रशिबिरास नगरपालिकेने दिलेले १० हजार रुपयाचे अनुदान हे अयोग्य व बेकायदेशीर आहे म्हणून ऑडिटरने ऑडिट काढलेले आहेच.

यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या संचालक मंडळावर बार्शी, अक्कलकोट, सांगोला वगैरे नगरपालिकेतून एक सभासद पाठवायचा होता. त्याप्रमाणे विद्यापीठांनी सर्व म्यु. पल सभासदांना मतपत्रिका पोस्टाने पाठवून दिल्या तेव्हा मात्र काही सभासदांनी पूर्वीच्या दोन-तीन अनुभवानंतर याखेपेस मतपत्रिकेवर आपले मत योग्य उमेदवारास नोंदवून मतपत्रिका परस्परच विद्यापीठाकडे पाठवून दिल्या. त्यामुळे ह्या नगराध्यक्षाला या काही लोकांचा (सभासदांचा) राग आला. शिवाय हे असेच वागत राहिले तर पुढे आपणास या पदावर ते राहू द्यायचे नाहीत या धूर्त विचाराने ते पछाडले गेले.

दर महिन्याच्या जनरल बोर्डात विषयपत्रिकेवर भरपूर विषय असत. परंतु कोणत्याही विषयाची सखोल चर्चा, साधक बाधक विचार किंवा एखाद्या विषयावर शंकासमाधान असे कधीही घडत नसे. फक्त विषय वाचणे, त्यावरील ठराव वाचणे व पास म्हणून सांगणे. जर कुणी काही शंका विचारण्याचा किंवा चर्चा करण्याचा प्रयत्न केला तर त्यास दम भरून गप्प बसविणे व सभेनंतर त्यास अक्षरश: बोलावून घेऊन पुन्हा दम भरणे, असे प्रकार सुरू झाले. सभेचे इतिवृत्त (प्रोसीडिंग) न वाचताच ते वाचून मंजूर केले असे म्हणत. त्याबद्दल काही सभासद फारच नाराज झाले. इथे सभा चालू असता उगीच तू–मी– नको म्हणून ते सभासद सभा संपताच सदर प्रोसिडिंग बुक पाहू लागले. तेव्हा तर अध्यक्षांनी ते पाहू दिले नाहीच, पण म्यु. पल कर्मचारी व चीफऑफिसर यांना तोंडी ताकीद दिली, की 'प्रोसीडिंग बुक व कोणतेही कागदपत्र कोणालाही दाखवायचे नाहीत. कोणाला काय करायचे ते करू द्या. मी खंबीर आहे. आणि खरेच, नगरपालिकेतील काहीच पहायला मिळेनासे झाले. सभासदांनी कितीही मागणी केली, तरी त्यांना कागदाचा कपटासुद्धा पाहायला मिळेना. चीफ-ऑफिसर म्हणे – 'कागदपत्र व प्रोसीडिंग अध्यक्षांचे बंगल्यावर म्हणजे मिलवर आहेत.'

तेव्हा या सर्व गोष्टींची चीड येऊन एक-दोन सभासद अगदी निर्भयतेने कामाला लागले. या अन्यायाला वाचा फोडण्याचे त्यांनी ठरविले. इथपर्यंत शहरात सर्व काही व्यवस्थित चालले आहे असाच भास निर्माण केला गेला होता. परंतु नंतर मात्र नगरपालिकेतून बरीच बारीकसारीक माहिती गोळा केली गेली. अनेक बेकायदेशीर गोष्टी, ठराव एकत्र केले गेले. अध्यक्ष, मॅनेजिंगडायरेक्टर असलेल्या जयशंकर मिलकडून न. पा. केची घरपट्टी १ लाख ४७ हजार रुपये थकलेली आहे. ती १९६२ पासूनची आहे. परंतु वसुली नाही. कारण काय ? तर ... सदर जयशंकर मिल व नगरपालिका यांचे या टॅक्सचे बाबतीत काही केसेस कोर्टात चालू आहेत. म्हणजे केवळ कायद्याचा आधार दाखवून किंवा दिशाभूल करून हे सर्व चालले आहे. अशाप्रकारे नगरपालिकेत पाईपलाईन्स, शिसे खरेदी प्रकरण, ताडपत्री खरेदी प्रकरण, ट्यूबलाइट प्रकरण, रस्तेदुरुस्ती प्रकरण...अशा अनेक बेकायदेशीरपणे चाललेल्या गोष्टींची वाच्यता बाहेर होऊ लागली. आपणास या गोष्टींचा कदाचित् त्रास होईल, म्हणून या नगराध्यक्षांनी जे विरोध करतात व जे या गोष्टी हुडकून काढून जनतेसमोर ठेवतात त्यांना आपल्या सत्तेच्या बळावर त्रास देण्यास सुरूवात केली. ज्या विरोधी सभासदांची शहरात दुकाने आहेत, त्यांचेवर भेसळ प्रतिबंधक कायद्याखाली खोटे खटले भरणे, शॉपअॅक्टखाली खोटे खटले भरणे, बाहेरगावाहून आलेला त्यांचा माल जकातीसाठी थांबला असता त्याची नासाडी करणे वगैरे अनेक अघोर व निंद्य प्रकार त्यांनी चालू केले. याही गोष्टीला या सभासदांनी समर्थपणाने तोंड दिले. धैर्याने सामना दिला. परंतु काही सभासद गरीब व नोकरी करणारे होते. ते

म्यु. पल सभासद अशा त्रासांना घाबरले. त्यांना आर्थिक कोंडीत आणून त्यांनी त्यांचेशी वाटाघाटीचा फार्स सुरू केला. त्यांचेकडून त्यांना विश्वास दाखवून व माझेशी तुम्ही प्रामाणिक रहा, मी तुम्हांस सदैव मदत करीन, पण जर माझेशी वैर पत्करलेत व माझी दुष्कृत्ये बाहेर सांगत सुटलात तर मी तुमचे बरे-वाईट करण्यास समर्थ आहे, असा दम भरून त्यांचेकडून कोऱ्या कागदावर त्यांच्या सह्या घेतल्या. व मग त्यांना सोडून दिले.' ◻

## इतर अपप्रकार

बार्शी नगरपालिकेची चालू खात्यात बरीच रक्कम राहू लागली म्हणून ती बचत खात्यात गुंतवावी असा विचार करून ता. २८–२–६८ रोजी नगराध्यक्षांनी आयत्या वेळचा विषय घेऊन पुढील ठराव करून घेतला–' मे. मुख्याधिकारी यांचा ता. ६–२–६८ चा रिपोर्ट पाहिला. सरकारी ग्रँट येणार असल्यामुळे व सध्या वसूलही बराच असल्यामुळे करंट व सेव्हिंग्ज अकौंटला बरीच रक्कम राहणार असल्यामुळे व्याज जास्त मिळण्याच्या दृष्टीने शॉर्ट टर्म डिपॉझिटमध्ये व काही रक्कम कॉल डिपॉझिटमध्ये शेडयूल बँकेत गुंतविणेचा अधिकार मा. अध्यक्षसाहेब यांना देण्यात येत आहे. तसेच यापुढे ज्यावेळी रक्कम गुंतविण्याचा प्रश्न निर्माण होईल त्या त्या वेळी मे. अध्यक्षसाहेब यांनी जरुरीप्रमाणे रक्कम बँकेत ठेवावी व यासंबंधीचे सर्व अधिकार त्यांना देण्यात येत आहे.'

या ठरावावर आठ महिने काही हालचाल झाली नाही. नंतर ऑक्टोबरात पुढीलप्रमाणे हुकूम उपाध्यक्षांनी दिला–

'(मे. कौंसिल ठराव नं. १८९ ता. २९–२–६८ ने दिलेल्या अधिकारान्वये) मे. मुख्याधिकारी बार्शी नगरपालिका यांस – मे. व्हाईस चेअरमन बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँक लि. यांचेकडून ९१ दिवसांच्या शॉर्ट टर्म डिपॉझिटकरिता द. सा. द. शे. ७½ टक्के व्याज देऊ अशाबद्दल मे. अध्यक्षसाहेब यांच्याशी फोनवर बोलणे झाल्याप्रमाणे. त्यांनी ता. ७–१०–६८ चे पत्राने कळविले आहे.

तरी या कामी आज रोजी चर्चा झाल्याप्रमाणे म्यु. पल फंडातून रु. ७५००० (पंचाहत्तर हजार) फक्त युनायटेड वेस्टर्न बँकेच्या सेव्हिंग्ज खात्यामधून काढून ती बार्शी मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये ९१ दिवसांच्या मुदतीने वरील व्याजाने तावडतोब ठेवण्यात यावी.'

हा हुकूम मूळ ठरावाचा भंग करणारा आहे. कारण मूळ ठरावात म्हटले आहे, की जास्त व्याज मिळण्यासाठी रक्कम शेडयूल बँकेत गुंतवावी, पण हुकूम दिला गेला एका शेडयूल बँकेतून रक्कम काढून एका सहकारी बँकेत ठेवण्याचा. १९६५ च्या नगरपालिका कायद्यानुसार नगरपालिकेचा पैसा शेडयूल बँकेतच ठेवण्याचे बंधन आहे. सहकारी बँकेत ठेवायचा असेल तर महाराष्ट्र सरकारची परवानगी

घ्यावी लागते. राज्य सरकारने १९६७ मध्ये सर्व ठिकाणची परिस्थिती पाहून नगरपालिकांना आदेश दिला, की सहकारी बँकेत पैसा ठेवण्याचा त्यांनी विचार करू नये व परवानगी मागू नये. बार्शी नगरपालिकेने १९६७ साली बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेत खाते उघडले होते. ते बेकायदेशीर आहे, सबब ते बंद करावे असा आदेशही महाराष्ट्र सरकारने दिलेला होता.

इतकी सर्व पार्श्वभूमी असताना नगरपालिकेचा पैसा बार्शी मर्चंट्स बँकेत ठेवला गेला. कारण बँक डबघाईला आलेली होती व भाऊसाहेबच तिचेही चेअरमन होते. हे त्यांचे कृत्य नगरपालिका कायद्याचा भंग करणारे व बार्शी नगरपालिकेच्या ठरावाचा विश्वासघात करणारे आहे, सबब भाऊसाहेब झाडबुके (नगराध्यक्ष) व श्री. पुसाराम करवा (उपाध्यक्ष) यांना नगरपालिका अधिनियम क. ४२ अन्वये अधिकारपदारून दूर करावे व त्यांचे सभासदत्वही रद्द करावे अशी मागणी अकरा न. पा. सदस्यांनी ता. १२–१–७० ला पत्रद्वारे केली. (कायद्यानुसार क. ४२ खालील कारवाई करण्याचा अधिकार राज्य सरकारलाच आहे.)

त्याला नगरविकासखात्याने उत्तर पाठविले, की 'बार्शी. न. पा. च्या कारभारात आणखीही बरेच घोटाळे आहेत, म्हणून झाडबुके व करवा यांच्यावर कारवाई करण्याऐवजी सर्व नगरपालिकाच बडतर्फ करण्याचा सरकार विचार करीत आहे.'

बार्शी न. पा. तील भ्रष्टाचार व अपप्रकारांबद्दल काही नगरसेवकांनी व नागरिकांनी सरकारकडे तक्रारी केल्या होत्या. त्यांची चौकशी एका वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत झाली. तिचा अहवाल कलेक्टरांनी ता. २६–३–७० ला राज्य सरकारला सादर केला होता. त्या आधारे नगरपालिका बडतर्फ का करू नये यासाठी कारणे दाखवा नोटीस राज्य सरकारने ता. २५ मे १९७० ला नगरपालिकेला पाठविली. तीत नगरपालिकेच्या कारभारातील पुढील अपप्रकारांचा उल्लेख केलेला होता–

१ : शिसे खरेदी करार करून माल येण्यापूर्वीच अध्यक्षांनी गणेश कॉर्पोरेशन पुणे यांना रु. ४९३७ · ५० व पुन्हा ता. १६–५–६९ ला अॅडव्हान्स रु. ४००० दिले. माल अतिशय अपुरा आला.

२ : बार्शी मर्चंटस् को-ऑप. बँकेची अडचण भागविण्यासाठी न. पा. प्रॉ. फंडातून रु. २०,००० काढून नियमाविरुद्ध त्या बँकेला दिले.

३ : रु. ७५,००० ची रक्कम नियमाविरुद्ध व ऑडिटरला गुंडाळून ठेवून बार्शी मर्चंट्स को-ऑप. बँकेत ठेवली.

४ : जयशंकरकडे रु. १,३४,००० ची थकबाकी आहे, पण वसुलीची काहीही हालचाल केली नाही.

५ : एम्प्लॉयमेंट कायदा १९५९ हा ता. १–१०–६० पासून नगरपालिकांना लागू झाला आहे. तरीही जाहिराती न देता, मुलाखती न घेता व एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजला न विचारता अध्यक्षांनी स्वतःच्या इच्छेने व लायकी नसलेल्या व्यक्तींना

महत्वाच्या जागीही नेमणूका दिल्या.

६ : सरकारी मंजूरी घेण्याचे टाळण्यासाठी मोठ्या रस्त्यांच्या कामांचे दहा हजाराच्या आतील तुकडे करून खर्च परस्पर करून जमाखर्च ठेवला नाही.

७ : सोनखताचा लिलाव वशिल्याने तालुका पंचायत समितीच्या उपसभापतींना दिला व त्यांनी नियमानुसार पैसे भरण्यापूर्वीच त्यांना माल उचलू दिला.

८ : नगरपालिका दवाखान्यासाठी सिव्हिल सर्जनच्या शिफारसी व संमतीशिवायच स्थानिक दुकानदारांकडून मोठ्या प्रमाणावर माल घेतला.

९ : मोठ्या खर्चांच्या रकमांचे विषय अजेंड्यावर रीतसर न घेता आयत्या वेळचे म्हणून घेतले.

१० : टेंडर व भाव न मागविता सॅनिटरी कमिटीच्या ठरावाविरुद्ध बार्शी ग्राहक भांडाराकडून ताडपत्री वगैरे माल घेतला. (त्यावेळी त्या भांडाराच्या अध्यक्षपदी नगराध्यक्षच होते.)

११ : स्वत:च्या संचालकत्वाखालील बार्शी महाविद्यालयाला एका रकमेने एक लाखाची देणगी ऐन वेळच्या ठरावाने दिली.

१२ : त्याच महाविद्यालयाच्या बांधकामासाठी न. पा. च्या विटा वगैरे साहित्याचा व मजुरांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला.

१३ : न. पा. ची कागदपत्रे नगराध्यक्ष आपल्या बंगल्यावरील तिजोरीत ठेवतात.

या 'कारणे दाखवा' (शो कॉज)नोटिशीला न. पा. चे हजारो रुपये खर्च करून उत्तर दिले गेले. त्यामुळे समाधान होऊन बार्शी न. पा. बडतर्फ न करण्याचे राज्य सरकारने ठरविले व ता. २५–१–७१ रोजी (म्हणजे प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी) संबंधित सभासदांना कळविले !

रु. ७५,००० बार्शी मर्चंटस् बँकेत ठेवण्याच्या बेकायदेशीर कृत्याबद्दल सोशॅलिस्ट पार्टीने ना. राजारामबापू पाटलांना निवेदन दिले होते. (जुलै ७० मध्ये). त्याचे उत्तर नगरविकासखात्याचे अवर सचिव श्री. मुहंमद अली यांनी १९७१ च्या जूनमध्ये पाठविले व कळविले, की 'नगरपालिकेचा निधी बार्शी मर्चंटस् को-ऑप. बँकेमध्ये गुंतविण्याचा अधिकार अध्यक्षांना १९६३ साली दिलेला आहे. आणि तीच प्रथा नंतरच्या काळात चालू आहे. उपरिनिर्दिष्ट बँकेमध्ये निश्चित काळपर्यंत ठेवलेली (फिक्स्ड डिपॉझिट) रु. ७५००० ची रक्कम परत करायला ती बँक असमर्थ ठरल्यामुळे नगरपालिकेने ती रक्कम परत मिळविण्यासाठी एप्रिल १९७० मध्ये सिव्हिल जज्ज सोलापूर यांच्या कोर्टात दिवाणी दावा दाखल केला आहे. याचा निर्णय प्रतीक्षाधीन आहे.'

अवर सचिवांनी दिलेले हे उत्तर कायद्याला सोडून व नगराध्यक्षांच्या बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालणारे होते. म्हणून त्याविरुद्ध सोशॅलिस्ट पार्टीने ७ जुलै १९७१ ला मुख्य सचिवालयाकडे तक्रार करून त्या अधिकाऱ्याच्या चौकशीची

मागणी केली होती, त्याबद्दल उत्तरच नाही.

हा प्रश्न विधानसभेत निघाला असताना नगरविकास खात्याचे उपमंत्री श्री. मदन गोपाल अग्रवाल यांनी नगराध्यक्षांचे कृत्य बेकायदेशीर आहे हे मान्य केले, पण त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची गरज नाही असे म्हटले. वास्तविक हे त्यांचे उत्तर त्यांनी मंत्रिपदाची जी शपथ घेतली तिचा भंग करणारे आहे. मंत्रिपदाची शपथ अशी आहे, की 'राज्यघटनेशी एकनिष्ठ राहीन व कायद्यांचे पालन करीन.' नगरपालिका कायद्यातील कलम ४२ अन्वये कारवाई न करणे आणि नगराध्यक्षांच्या बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालणे म्हणजे बेकायदेशीर कृत्यांना मदत करणेच होय. (इंडियन पीनल कोडमध्ये हे तत्त्व एका कलमान्वये स्वीकारण्यात आलेले आहे.)

का कोणास ठाऊक, नगरविकासखात्याचे मंत्री व उपमंत्री श्री. झाडबुकेंच्या सर्व बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालीत आहेत. येथील न. पा. च्या कारभाराबाबत कलेक्टरांनी पाठवलेला अहवाल विधानसभेत दाखवायला त्यांनी विरोध केला व विधिमंडळ कामकाजाचे मंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी 'एखाद्या अधिकाऱ्याचा अभिप्राय मागण्याचा सभासदांना अधिकार नाही' असे सांगितले. पण तीन-चार दिवसांनीच आर्वी नगरपालिकेच्या कारभाराबाबतच्या अधिकाऱ्याच्या अहवालातील बराच मजकूर नगर विकासमंत्र्यांनी विधानसभेत वाचून दाखवला. या पक्षपाताविरुद्ध सर्व विरोधी पक्षांनी सभात्याग केला–पण उपयोग काय ?

□

# मधुघट

□ □ □ □

शेती हा झाडबुक्यांचा वंशपरंपरा धंदा नव्हता. ते पहिल्यापासूनचे व्यापारी आणि भाऊसाहेब स्वत: कायद्याचे पदवीधर. श्रीमती प्रभाताईंनाही शेती करणे माहीत नव्हते. पण हरित क्रांतीच्या मानकऱ्यांत आपलेही नाव झळकले पाहिजे या ईर्षेने श्री. भाऊसाहेबांनी जमिनी खरेदी करायला सुरुवात केली. बार्शीपासून अकरा मैलांवर एका ओढ्यालगत घारी-पुरी या जोडगावात त्यांनी शेती घेतली. थोडीशी स्वत:च्या नावावर, बरीचशी प्रभाताईंच्या व इतर नातलगांच्या! संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे आहे–

| अ. नं. | जमिनीचे वर्णन क्षेत्र ए. गुंठे | घेणाराचे नाव | व्यवहार व तारीख |
|---|---|---|---|
| १. | ७०/१ अ ९·२९ | शंकरराव ऊर्फ भाऊसो झाडबुके | रु. १५,००० : ६–४–६२ |
| | ७०/१ ब पैकी १/३ ०·२ | " " | |
| | ७०/२ पैकी १/३ ०·६ | " " | |
| | कन्सॉलिडेशन नं. २८२ | | |
| २. | ७०/१ क ०·३८ | " " | ३५०० : ३–७–६२ |
| | ७०/१ ड पैकी १·०० | " " | |
| | ७०/१३–१ अ ०·२० | " " | ५०० : २२–७–६३ |

या जमिनी ता. २–९–६८ च्या सुमारास प्रभाताईंच्या नावे रु. १,२५,००० किंमत दाखवून बक्षीस करून दिल्या.

| | स. न. | | |
|---|---|---|---|
| ३. | ५६/१ अ ०·१८ | प्रभाताई शंकरराव झाडबुके | १५० : १३–११–६३ |
| | ५६/२ ब ०·५ | " " | |
| | क. नं. | | मुदत-खरेदी १० वर्षे |
| ४. | ११० १·३४ | शंकरराव ऊर्फ भाऊसो झाडबुके | २००० : २८–५–६९ |
| ५. | २८७ ५·१८ | प्रभाताई शंकरराव झाडबुके | १,२५,००० : २४–७–६७ |
| ६. | २८६ पैकी ४·०० | " " | २४,००० : १९–२–७१ |
| ७. | २८४ २·८ | प्रभाताई शंकरराव झाडबुके | ५,००० : १–२–७१ |
| ८. | २७६ ३·१० | " " | ४,५०० : २५–३–७१ |
| ९. | २८६ पैकी ८·०० | " " | १०,००० : – –७१ |
| १०. | २८१ ५·४ | " " | १६,००० : – –७१ |
| ११. | २२७ ६·८ | " " | २८,००० : साठेखत फक्त |
| १२. | २७३ ६·१३ | दत्तात्रय शिवलिंग दिवटे | ५,००० : १२–७–६७ |
| १३. | २७९ २·२२ | " " | ३,००० : १२–७–६७ |
| १४. | २८० ६·९ | " " | ३,००० : १२–७–६७ |
| १५. | २७५ ६·६ | " " | ५,००० : २६–७–६९ |
| | (यापैकी ३ एकर २ गुंठे विकली.) | | |
| १६. | २७० पै. १·० | " " | २,००० : २६–७–६९ |
| १७. | २७७ ४·१६ | " " | १०,००० : ३–९–७० |

श्री. दत्तात्रय शिवलिंग दिवटे हे श्री. भाऊसाहेब झाडबुके यांचे मेहुणे असून तेच शेतीची दैनंदिन व्यवस्था पाहतात. यावरून असे दिसते, की स्वत: भाऊसाहेबांच्या नावावर ९ एकर ३८ गुंठे, प्रभाताईंच्या नावावर ३९ एकर आणि श्री. दिवटेंच्या नावावर २३ एकर २७ गुंठे म्हणजे सर्व मिळून ७२ एकर २५ गुंठे जमीन झाली आहे. त्यासाठी त्यांनी सुमारे रु. २,६१,६५० किमतीदाखल दिले असे कागदोपत्री दाखवले आहे. 'कागदोपत्री दाखवले' असे म्हणण्याचे कारण असे, की बऱ्याचशा जमिनी त्यांनी धाकदपटशा दाखवून उपटल्या आहेत. एका तरुण शेतकऱ्याला सव्वा लाख रुपये किमतीदाखल ठरविले. हातावर प्रत्यक्ष पाचशे रुपये ठेवले आणि सांगितले, 'तू कॉलेजचे शिक्षण घे, मी तुझा खर्च चालवीन.' बिचाऱ्याने विश्वास ठेवून कॉलेजात प्रवेश घेतला. पुढल्या महिन्यात तो गिरणीवर पैसे मागायला गेला, तेव्हा त्याला धक्के देऊन बाहेर काढण्यात आले. त्याला वेड लागले असून तो रानोमाळ भटकतो आहे. इतर काही शेतकऱ्यांना भीती दाखवून, त्यांची उभी पिके कापून, त्यांची इंजिने फोडून अखेरीस जबरदस्तीने त्यांच्याकडून खरेदीखते करून घेतली आहेत. खरेदीखतांत दाखवलेल्या रकमांपैकी प्रत्यक्षात किती पैसे खरेदी देणाराच्या हाती पडले असतील हे सांगणे कठीण आहे.

ही सगळी शेती बार्शी–लातूर या हमरस्त्याला लागून आहे. पाथरी तलावाचा कालवा या शेतांजवळून जात असून घारी–पुरीच्या दरम्यानचा ओढाही यांच्या लगत आहे. ओढ्याच्या जमिनीत भाऊसाहेबांनी बरेच अतिक्रमण केलेले दिसते. चुलाण वगैरे ओढ्याच्या हद्दीतच घातले आहे. कालव्याच्या जवळ स्वत:च्या हद्दीत भाऊसाहेबांनी एक मोठा डोह खणून ठेवला आहे. कालव्याचे पाणी केव्हाही या डोहात भरून घेता येते. १९६४–६५ च्या दुष्काळाच्या वेळी व त्यानंतरही पाण्याची इतरांना कितीही टंचाई असली तरी या डोहामुळे भाऊसाहेबांच्या शेतीला पाण्याची कधी कमतरता नसते. तेथील द्राक्षाचा मळा आणि फुलबागा नेहमी फुललेल्या असतात. विजेची लाईनही अग्रहक्काने त्यांना मिळाली आहे.

या शेतीवर राबतात जयशंकरचे मजूर. बार्शी तालुका पंचायतसमितीचा पैसा, जयशंकरच्या जीपगाड्या, बार्शी नगरपालिकेचे पाइप्स, सीमेंट आणि खडी. असा सर्वांचा हातभार लागल्याने ही शेती दुष्काळातसुद्धा भरघोस पिकते. तेथील फुले दररोज मुंबईला जातात. हंगामात द्राक्षाचे पेटारे बार्शीतल्या अनेक व्यापाऱ्यांक ाठवले जातातआणि आठ दिवसांनी जातो बिले वसूल करणारा ! शेतीसाठी पंचायत समिती व सरकारकडून घेतलेल्या कर्जापैकी एक पैही परत दिलेली नाही. वसुलीला जायची अधिकाऱ्यांची हिंमत नाही.

घारा–पुरी हे छोटेखानी जोडगाव. तेथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे भाऊसाहेब सभासद झाले. त्यांनी शेतीसाठी सोसायटीमार्फत जिल्हा म. स. बँकेकडून कर्ज काढले. इतर खातेदारांना कर्ज मिळाले हजार दोन हजारांचे. पण भाऊसाहेब

एकदम प्रगतिशील शेतकरी बनल्याने त्यांना कर्ज मिळाले रु. १,१५,००० चे. या सोसायटीच्या सभासदत्वाच्या जोरावर ते सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर दोनदा निवडून गेले. पुढे कर्जफेड करणे त्यांच्या जिवावर येऊ लागले. म्हणून त्यांनी संचालकपदाचा नाद सोडला. थकबाकी भरली नाही. परिणाम एवढाच झाला, की सोसायटीच थकबाकीदार झाल्याने इतर सभासदांना लवकर कर्जे मंजूर होऊन मिळेनात. सोसायटीमार्फत वेड्यावाकड्या गोष्टी करायला त्यांनी चेअरमन व सेक्रेटरींना भाग पाडले. जेव्हा ते अगदीच ऐकेनासे झाले तेव्हा ' मधुघट 'वर आणून त्यांना यथास्थित चोप दिला.

मधुघट हा घारापुरी शेतावरील सुंदरसा बंगला. सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज. काही आदरणीय पाहुण्यांचे आतिथ्यपूर्ण स्वागत तेथे होते; तसेच, राजकारणाची अनेक खलबतेही तेथे शिजतात. अनेक मजुरांच्या बायाबापड्यांच्या अब्रूचे धिंडवडेही तेथेच निघतात. एक मासला म्हणून पुढील पत्र–

श्री. पन्नालाल सुराणा, अध्यक्ष, संसोपा, बार्शी.

सा. नमस्कार. वि. वि.

पत्राचे कारण फार मोठे आहे. रोज पेपरमध्ये येतात त्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. रोज काही काही विकून पैसे करीत आहे. त्याशिवाय पण फारच नीच गोष्टी आहेत. × × × ची मामेबहीण × × × हिला गिरणीच्या मालकाने भोगले. तिचा भाऊ कारकून होता. त्याला रात्री दोन वाजता बोलावले. खूप मारले त्याला. त्याला म्हणाला तुझी बहीण नवरा सोडून आली. ती त्या भिग्याकडे जाते हे तुला बरे वाटते काय ? आण तिला माझ्याकडे. म्हणून तो निघाला. तर पुन्हा मालक म्हणाला, की थांब दोन-तीन कोऱ्या कागदांवर सह्या घेतल्या अन गाडी काढून चल म्हणाला. त्याला घेऊन जयशंकर गिरणीच्या चाळीसमोर जाऊन त्याच्याकडून बहिणीला बोलावून आणून त्या दोघांना मधुघटात नेले व तिला आत घेऊन भोगली आणि भावाला बाहेर बसविले. नंतर दोघांना सोडून दिले. चार आठ दिवसात त्याचा राजीनामा घेऊन चोवीस तासात घर खाली करून त्यांना हाकलून दिले. नीचपणा आपण करायचा मग दुसऱ्याचे नुकसान करायचे. असाच दुसरा एक प्रकार. ' अशी कशी जाऊ मी नांदायला ' हे नाटक होते त्या रात्रीची गोष्ट. त्या रात्री मालक दीड वाजता घरी आला. दारू पिऊन. ते रोजचं आहे. तर्रर्र झाला. नंतर जमादाराला बोलावले. तुझी मुलगी आण. पण ती एका ब्राह्मणाने ठेवली आहे म्हणून ती येत नाही असे जमादार हणाला म्हणून त्याला खूप मारले तो मोठ्याने बोंबलत पळत सुटला. लगेच सर्व शिपाई पळत सुटले मालक पण पळत सुटला. हातात पिस्तुल होते. पण तो जमादार कोठेतरी जाऊन लपून बसला. तो सापडला नाही. जर सापडला असता तर खूनच झाला असता. सकाळी एका खात्यातून बाहेर पडला. पुन्हा त्याला हुसकून दिल्याने त्याला मारले. आता तो घरी. आधीच त्याला टी. बी. झाला आहे. पुन्हा चोराच्या

उलटचा बोंबा म्हणजे त्याला गेटवर नेले. असे प्रकार रोज चालू आहेत. शिवाय ××× येतेच. हंडीवाल्या मोलकरणी पण आहेत. अनर्थ चाललेला आहे. गिरणीत काही नाही. गवंडी सुतार विजेचे लोक मधुघटात जाऊन सर्व व्यवस्था करून येत आहेत. जाण्य.ची वेळ आली तर सर्व तयारी करीत आहेत. गोरगरिबांचे पैसे बुडविणे चालूच आहे. इतके पेपरामध्ये लिहून येते पण दोघांनाही लाज नाही. खुशाल चैन चालली आहे. सोने तीन चार हजार तोळे आहे. चार कोटी रुपये आहेत. शेते घेतलीत. सर्व लोकांच्या नावावर ठेवून आपण भिकारी दाखवितो. आहे की नाही काळीज. हा मजूरांचे रक्त पितो खरेच आहे. तुम्ही हे जाहीर करा. त्याला लाज नाही वाटणार. निदान लोकांना तरी माहीत होईल. मी आमदार काळदातेंना लिहिणार. पण ते आजारी आहेत. पत्ता माहीत नाही. तरी हे पत्र त्यांना पाठवा. सकाळमधले सर्व खरे आहे. आणखीसुद्धा खूप आहे. पण हे ताजे सांगितले असा माणूस जगात आहे की नाही. शिवजाणे. पुन्हा मानाने हिंडतात. दोघे हारतुरे करून घेतात. लाज कशी वाटत नाही हेच आम्हाला कोडे आहे. आमदार बाई म्हणते माझा नवरा राम आहे. तिला काय माहित नाही की किरीषण नसून रावण राक्षस आहे. पण बाई बेरकी आहे. पैसा पाहिजे. अब्रूचे खोबरे झाले तरी पर्वा नाही. अतिकठीण दिवस मुद्दाम आणले. याला बेड्या घालून हिंडवा. काय करता येईल ते करा. पण तुमच्यासारख्याने सरकारात आवाज उठवला तर तुम्ही खरे. मंत्र्यांना खायला, हारतुरे शिवाय पैसे चारायचे, बायलीला पुढे करून कामे करून घ्यायची. माझी बायको जरा सुरेख आहे म्हणून ते माझ्या मागे लागतात. पण मी तिला येथे ठेवीत नाही. फार हलकट आहे. आता काय करता ते बघा. लवकर जाहीर करा. रात्रभर धिंगाणा असतो. सकाळी. बारा वाजेपर्यंत मग मेल्यासारखा पडतो. दारू, बाई, पैसे याचे वेड आहे. मेंदू बिघडला आहे म्हणावे तर सर्वार्थ करून सर्वस्वार्थ कसा समजतो. आता तुम्ही काय करता ते मी पहातो. पुन्हा सरकारजवळ कर्ज मागितले आहे. परवा मंत्री काहीतरी करणार आहे. तेव्हा हे सरकार पण मूर्ख आहे. काय. बिचारे गरीब मरतात तेव्हा आता तुम्ही काही तरी करा. किती लिहू-सांगू असे झाले. राहवेना म्हणून सांगितले आहे. आता सर्वत्र पाहून संताप होतो. सर्व विकणे चालले आहे. गिरणीच्या फरशा गजने सर्व सर्व चालले. काही रहात नाही. पैसा करणे चालले आहे. तुमचा सेवक ×××

९.५.७० पोष्टाचे शिक्के. बार्शी.

हे पत्र पोलिस अधिकाऱ्यांकडे पाठवून वर मी लिहिले—

**महाशय,**

श्री. भाऊसाहेब झाडबुके यांच्या अरेरावी व अत्याचारी वागणुकीची अनेक प्रकरणे घडत असल्याच्या तक्रारी आमच्याकडे सारख्या येत असतात. नुकतेच

आलेले एक पत्र सोबत जोडीत आहे. पत्र लिहिणाऱ्याने स्वतःचे नाव लिहिलेले नाही, त्याचे कारण उघड आहे. श्री. झाडबुके एवढे अत्याचार करीत असताना सरकारी यंत्रणा त्यांच्याविरुद्ध परिणामकारक कारवाई करीत नाही त्यामुळे गोर-गरीब लोकांना उघडपणे खऱ्या गोष्टी सांगायला भीती वाटते. पोलीस खात्याने या गोष्टींची गंभीर दखल वेळेवरच घेतली नाही तर हा भस्मासूर पोलीस खात्यालाही खाऊन टाकल्याशिवाय राहणार नाही.

आपण याबाबत काही करू शकत असाल तर पहा. जे राजकीय कायकर्ते बेकायदेशीर कृत्य करतात त्यांच्या विरुद्ध चॅप्टर केससकट प्रतिबंधक उपाय-योजनांची पोलिसांना मुभा आहे असे मुख्यमंत्र्यांनी नुकतेच विधानसभेत सांगितले आहे. आमच्यासारख्या डाव्या विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना या गोष्टीचा अनुभव येतो की सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सत्याग्रहासारख्या नैतिक व लोकशाही मार्ग अवलंबण्याचे आम्ही जाहीर केले तरी प्रतिबंधात्मक उपाय योजले जातात तर कधी लाठीमार होऊन उलटे खटले भरले जातात. पण जे काँग्रेस कार्यकर्ते दिवसा ढवळ्या वाटेल ते गुन्हे करतात त्यांच्या विरुद्ध मात्र पोलीस यंत्रणा कार्य-वाही करीत नाही हे न्यायाला धरून आहे असे वाटत नाही. आपण या गोष्टीचा विचार कराल अशी आशा आहे.

कळावे.

पोलीस अधिकाऱ्यांकडून उत्तर आले–"तपास चालू आहे."

जयशंकरच्या आवारात राहणाऱ्या एका मित्राला व नोकराला छळण्याची लहर भाऊसाहेबांना आली. एके दिवशी रात्री हातात पिस्तूल घेऊन ते त्याच्या घरी गेले. खूप शिव्या दिल्या. पण त्याने हिंमतीने प्रतिकार केला. दुसऱ्या दिवशी तो नोकर मुलाबायकोसकट गावात आला. पोलीसठाण्यावर जाऊन फिर्याद नोंदवली. पोलीस-तपास झाला. भाऊसाहेबांना अटक करणे व दमदाटीसाठी वापरलेले पिस्तुल जप्त करणे पोलिसांना आवश्यक वाटले. पण एका मंत्र्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला फोन करून सांगितले की तसे करू नका. शेवटी दुसऱ्या एका मंत्र्याचा स्वाभिमान जागा केला तेव्हा कोठे पोलीस अधिकाऱ्यांना कायद्यानुसार कारवाईकरता आली. तरी अटक झाल्याबरोबर जामीनावर सुटका झालीच. 'एक पिस्तुल जप्त झाले म्हणून काय झाले ? आणखी एक पिस्तुल व बंदूक आहेच' अशी शेखी मिरवीत भाऊसाहेब घारीपुरीच्या परिसरातील शेतकरी-शेतमजुरांना दाब देत आहेत.

घारीच्या दृष्टीतील एक जमीन ॲक्वायर करून दलित कुटुंबियांना ती रहायला द्यायची होती. त्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करून वर पाठवला. प्रांताकडून मंजुरी आली. प्लॉट पाडून कबजे द्यायचे–तोच भाऊसाहेबांची नजर त्या जमिनीवर गेली. त्यांनी तावडतोब त्या जमिनीला कुंपण लावून टाकले. संबंधित कागदपत्रे

गहाळ झाली. भाऊसाहेबांनी त्या जमिनीचे साठेखत आमदार प्रभाताईंच्या नावे करून घेतले. दलित मंडळी तक्रार करायला लागली. एका रात्री त्यांना खूप दम दिला. बिचारी घाबरून पुण्याला पळून गेली.

मधुघटच्या जवळून एक वाट आहे. पलीकडे एकाचे शेत आहे. त्या जमिनीची लालसा भाऊसाहेबांच्या मनात निर्माण झाली. तो शेतकरी बऱ्या बोलाने जमिनी देणार नाही असे भाऊसाहेबांना वाटले. त्यांनी ती वाटच बंद करून टाकली. दोन वर्षे झाली, त्याचे शेत पडीक पडले आहे. त्याने कोर्टात दावा केला. निकाल त्याच्या सारखा झाला. पण अंमलबजावणीचे काम तहसीलदार कचेरीमार्फत कसे काय होईल शंकाच आहे.


# शिक्षणक्षेत्रातील झाडबुकेंची कामगिरी

ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रातही भाऊसाहेब आणि प्रभाताईंनी अशीच मोलाची कामगिरी बजावली आहे! के. एल्. ई. सोसायटीच्या सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या स्थानिक समितीवर ते असतातच. त्या शाळेतील शिक्षकांना निवडणुकीच्या प्रचारकार्यात जुंपणे ओघानेच आले. काहीकाळ प्रभाताई स्कूलबोर्डाच्या चेअरमन होत्या. त्याहीवेळी प्राथमिक शिक्षकांना असेच राबवून घेतले.

सात-आठ वर्षांपूर्वी त्यांनी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळी या नावाची संस्था स्थापन केली. तिच्या वतीने अध्यापिका विद्यामंदिर सुरू केले. प्रवेशासाठी गर्दी वाढू लागली म्हणून देणगी व डिपॉझिट दोन्ही घ्यायला सुरुवात केली. ज्यांचे शिक्षण संपले अशा विद्यार्थिनींनी डिपॉझिट परत मिळावे अशी मागणी केली. 'आज देऊ, उद्या देऊ' असे चाळवणे सुरू झाले. शेवटी डिपॉझिट म्हणजे देणगी नंबर दोन असे समीकरण गरजू विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनी बसवून टाकले. गंमत अशी की एवढे करूनही विद्यामंदिराच्या वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनींकडूनही विजेचे बिल घेतल्याशिवाय संस्थेचे खर्च भागत नाहीत म्हणे!

अध्यापिका विद्यामंदिरचे एक प्रॅक्टिसिंग स्कूल आहे. तेथील शिक्षक-शिक्षिकांना पगार कमी दिला जातो. त्याबद्दल एका शिक्षिकेने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. तर त्या शिक्षिकेचा जबरदस्तीने राजीनामा घेतला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कळविले, की त्या शिक्षिकेचा नवरा दारू पिऊन तिला मारहाण करतो व त्यानेच तो अर्ज पाठवला! वरिष्ठ अधिकारी तपास करीत आहेत!

अध्यापिका विद्यामंदिरला जागा दिली आहे, जयशंकर गिरणीच्या आवारात. त्यासाठी भाडे भरपूर घेतले जाते आणि अध्यापिका विद्यामंदिर नुकसानीत चालते




म्हणून बार्शी नगरपालिकच्या वतीने त्या सस्थेला मोठमोठ्या रकमांचे अनुदान दिले जाते. जवाहर छात्रालय या वसतीगृहालाही अनुदान मोठ्या प्रमाणावर दिले जाते.

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाने त्यानंतर एक टेक्निकल हायस्कूल काढले. त्यालाही जागा जयशंकरच्या आवारात. त्यानंतर कॉलेज काढणे ओघानेच आले. 'बार्शी महाविद्यालय' या नावाचे एक आर्टस् व कॉमर्स शाखांचे कॉलेज १९६९ साली सुरू करण्यात आले. त्यासाठी बार्शी नगरपालिकेकडून एक लाखाची देणगी देण्यात आली. शहरातील व्यापाऱ्यांकडून एकेक हजाराच्या देणग्या 'खुषीने' घेण्यात आल्या. येथवर तसे 'रीतसर' झाले. जागा अर्थातच जयशंकरच्या आवारात. दोन-तीन खोल्यांचे बांधकाम करायचे होते. एका कंत्राटदाराला कंत्राट दिले. नगर-पालिकेची खडी, सिमेंट व मजूर मोठ्या प्रमाणावर कॉलेजच्या बांधकामासाठी वापरले गेले. कॉलेजचे फर्निचर आणण्यासाठी नगरपालिकेचा ट्रॅक्टर व ट्रॉली मनमुराद वापरण्यात आली. त्याविरुद्ध आरडाओरडा झाला. म्हणून पुढच्या वर्षी भाऊसाहेबांनी नगरपालिकेची आणखी एक लाखाची देणगी आयत्या वेळचा विषय म्हणून मंजूर करून घेतली आणि त्यापैकी लगेच चाळीस हजार 'संस्थेची विशेष अडचण' लक्षात घेऊन देऊन टाकले. या ठरावाविरुद्ध कलेक्टरांकडे नागरिकांनी

अर्ज केला. सुदैवाने कलेक्टरांनी कायद्यानुसार त्या ठरावाची अंमल–वजावणी स्थगित करण्याचा हुकूम दिला. निदान साठ हजार तरी वाचले. तेव्हा भाऊसाहेबांनी वेगळीच शक्कल काढली. १९७१ च्या जूनमध्ये त्यांनी बार्शी नगरपालिकेच्या सभेत आयत्या वेळचा विषय मांडून ठराव पास करून घेतला, की 'बार्शी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बाराशे पोती सिमेंट व पंचवीसशे ब्रास खडी उधार देण्यात यावी' त्याप्रमाणे माल लगेच देण्यात आला !

नगरपालिका-अधिकाऱ्यांना विचारले, 'असा माल उसनवार देण्याची तरतूद कायद्यात आहे काय ?' त्यांनी शांतपणे उत्तर दिले, 'अशी उसनवार देऊ नये अशी तरतूद कायद्यात नाही.' त्या मालाचा उपयोग बार्शी महाविद्यालयाच्या कामासाठी थोडाफार झाला असेल. पण त्याचवेळी झाडबुकेंच्या घारीपुरी येथील मधुघट शेताला एक भव्य प्रवेशद्वार बांधले गेले हेही खरे !

या प्रकरणाबाबत ऑडिटर्सनी उद्या हरकत घेतली तर भाऊसाहेब म्हणतील, 'बरोबर आहे, बार्शी महाविद्यालयाकडून सीमेंट व खडी वसूल झालीच पाहिजे. नाहीतर नगरपालिकेने त्यांच्यावर दावा लावावा.' किंवा सीमेंट व खडी परत आल्याची कागदोपत्री व्यवस्थाही एव्हाना झाली असेल !

बार्शी महाविद्यालयाचे प्रवेशद्वार सरकारी रस्त्याच्या जमिनीवर अतिक्रमण करून बांधले आहे. एका खाजगी व्यक्तीच्या बंगल्याचे असे अतिक्रमण हटविण्याचा धाक दाखवून भाऊसाहेबांनी त्याला राजकारणातून उठवले. पण त्यांच्या शिक्षणसंस्थेने केलेले अतिक्रमण उठवायचा धाक त्यांना कोण घालणार ?

बार्शीप्रमाणे घारीपुरीतही शिक्षणप्रसाराचे काम केले पाहिजे या उदात्त भावनेने प्रेरित होऊन १९७१ च्या जूनमध्ये त्यांनी घारीला 'नागनाथ विद्यालय' काढले. गावात भाड्याने जागा घेऊन शाळा सुरू केली आणि रस्त्याच्याकडेला असलेली सरकारी जमीन शाळेच्या इमारतीसाठी पाहिजे असे ठरवून त्यावर तसा बोर्ड लावून टाकला. वास्तविक ती जागा* ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहे. पण पंचायतीचा ठराव होण्याची भाऊसाहेबांनी मुळीच वाट पाहिली नाही. शिक्षणाच्या क्षेत्रात दिरंगाई होऊ देणे त्यांना अजिबात खपत नाही.

नागनाथ विद्यालयातील मुले काहीवेळ शिक्षण घेतात आणि काहीवेळ मधुघटजवळच्या बागेतील फुले तोडून ट्रकमध्ये भरायचे काम विनामूल्य करतात.

बार्शीतील एका वसतिगृहाची काही रक्कम जयशंकरकडे जमा आहे. विश्वस्तांनी मागणी केली की भाऊसाहेब विचारतात, 'आमच्याकडील पैसे बुडणार आहेत का ? ते सेफ डिपॉझिटमध्ये आहेत असे समजा.'

◻

[ *छायाचित्र पृष्ठ ३१ वर पाहावे. ]

# मधुघट आणि मंत्री

आपल्या बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठी मंत्र्यांना बोलावून मेजवान्या देणे व स्थानिक अधिकाऱ्यांवर जरब बसविणे हा भाऊसाहेबांचा खाक्या आहे. सर्वश्री वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई, (माजी मंत्री), डॉ. आबासाहेब खेडकर या मंत्र्यांच्या १९६२ ते ६८ च्या दरम्यान बार्शीला बऱ्याच भेटी झाल्या. प्रत्येकवेळी जयशंकरवर चहापान किंवा भोजनाचा कार्यक्रम हमखास असायचा. १९६९-७० पासून जयशंकरचे प्रॉव्हिडंट फंड प्रकरण विधानसभेत विशेष गाजू लागले. जयशंकरकडील थकबाकी—वसुलीसाठी गिरणीचा लिलाव होणार अशा बातम्या उठल्या. तेव्हापासून तर मंत्र्यांच्या बार्शीवाऱ्या विशेषच वाढल्या. विशेष म्हणजे श्री. आबासाहेब पारवेकर हे नव्याने मंत्रिमंडळात दाखल झालेले पांढरकवड्याचे बडे जमीनदार हे झाडबुक्यांचे नव्याने व्याही झाले होते. भाऊसाहेबांनी पारवेकर व देवतळे या दोन मंत्र्यांना बार्शीला बोलावले. कशासाठी तर एका चौकाला शाहीर अमर शेख यांचे नाव देण्यासाठी. अमर शेख मूळचे बार्शीचे त्यांच्या हयातीत झाडबुकेंना त्यांची आठवण कधी झाली नाही. पण मृत्यूनंतर मुस्लीम मोहल्यात त्यांच्या निमित्ताने एक समारंभ घडविण्याची संधी भाऊसाहेब कशी सोडणार ? म्हणून चौकाच्या नामकरण विधीसाठी दोन मंत्र्यांना बोलावले. आणि रात्री मेजवानी. त्याचे छापील निमंत्रण गावात अनेकांना पाठविण्यात आले ते पुढीलप्रमाणे—

धी जयशंकर मिल्स् बार्शी, लि.
बार्शी १४ मार्च १९७०

स. न. वि. वि.

माननीय नामदार आबासाहेब देशमुख, पारवेकर, राज्यमंत्री, उद्योग व वीज खाते, आणि माननीय नामदार रामचंद्रराव देवतळे, उपमंत्री, पाटबंधारे, वीज व शिक्षणखाते, महाराष्ट्र राज्य, यांच्या सन्मानार्थ आज रोजी सायंकाळी ठीक ७-१५ वाजता माझेकडे भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तरी सदर प्रसंगी आपण उपस्थित राहून आपल्या सहवासाचा लाभ द्यावा ही विनंती.

आपले,
भाऊसाहेब झाडबुके
सौ. प्रभावती झाडबुके.

त्यानंतर चारसहा दिवसांनी समाजकल्याण मंत्री ना. बाबराव भारस्कर आले. नगरपालिकेची गलिच्छ वस्ती हटविण्यासाठी. शहरातल्या सर्व झोपडपट्टया उठवायच्या व बाराशे गाळे बांधून त्यात त्या कुटुंबांची सोय करायची. योजनेचा खर्च सुमारे चाळीस लाख रुपये. पैकी पाच लाख नगरपालिका घालणार. बाकी रक्कम

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व व्यवस्था
नीट करायला
नको का?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का !

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति–प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत!

कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

## निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

davp 71/119

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

महाराष्ट्र सरकारने स्वतः किंवा एल्. आय. सी. मार्फत मिळवून द्यावी म्हणजे महाराष्ट्रातील एक आदर्श योजना बार्शी नगरपालिका राबवून दाखवील. (आशिया खंडात भारत तसेच महाराष्ट्रात बार्शी!) झोपडपट्टीतल्या एका रहिवाशाने शंका काढली. बार्शी नगरपालिका गेली ५-६ वर्षे सफाई-कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी रु. ७१००० ची तरतूद आपल्या अंदाजपत्रकात करीत आहे. पण एकही वर्षी ती घरे बांधून झाली नाहीत. मग बाराशे गाळे कसे बांधून होणार? त्यावर भाऊसाहेबांनी उत्तर दिले– 'लहान सहान योजना अंमलात आणायला आम्हाला सवड नाही. एकदम मोठी योजना आम्ही हाती घेणार. प्रथम सर्व झोपडपट्ट्या उठविणार. मग गाळे बांधणार. मंत्रीमहाशय एकदम खुष झाले. महाराष्ट्र सरकार तर्फे त्यांनी भरघोस आश्वासन दिले. नंतर जेवायला जयशंकरवर गेले त्यावेळी गावातील लोकांना निमंत्रण नव्हते.

हे प्रकार थांबावेत म्हणून बार्शी सोशॅलिस्ट पार्टीच्या वतीने सर्वश्री महालिंग राजमाने व रोहिदास कांबळे यांनी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात पत्रक काढले की..." बार्शी येथे गेल्या दहा दिवसांत तीन मंत्री आले. दोन मंत्री एका चौकाचे नामाधिकरण करण्यासाठी व एक मंत्री नगरपालिकेची एक योजना समजून घेण्यासाठी आले. हे सर्व मंत्री आपापल्या लवाजम्यासह जयशंकर गिरणीतील श्री. शंकरराव (भाऊसाहेब) झाडबुके यांच्या बंगल्यावर गेले. वास्तविक जयशंकर

---

## चार संडास, आठ मुताऱ्या!

एक निराळ्याच नमुन्याचा दावा. सोलापूर येथील सिव्हिल सूट नंबर ६२/७००. दिनांक ६ ऑगस्ट १९७०. म्युनि. च्या कॉंट्रॅक्टरने १. आमदार सौ. प्रभाताई झाडबुके, चेअरमन शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, २. त्यांचे पति श्री. शंकरराव झाडबुके, एजंट, जयशंकर मिल, बार्शी, ३. प्रिंसिपॉल, बार्शी महाविद्यालय, बार्शी व ४. श्री. आय. सी. पाटील चीफ ऑफिसर बार्शी म्युनि. कौन्सिल, या चौघांवर रु. १३,५३७ – २५ चा दावा केला आहे. त्यात, कॉलेजमध्ये म्युनिसिपालिटीकडून चार संडास व आठ मुताऱ्या बांधल्याचे बिल मागितले असता कॉलेजला जबर देणगी मागितली. ती दिली नाही म्हणून कॉलेजने म्हटले, की बांधकामाची ऑर्डर आम्ही दिली नाही. सबब आम्ही बिल देत नाही, अशी तक्रार आहे. म्युनिसिपालिटीतही बराच गवगवा झाला. 'कॉलेजच्या आवारात बांधलेल्या संडास-मुताऱ्यांचे बिल म्युनि.ने कसे द्यायचे' असा प्रश्न अधिकाऱ्यांनी उपस्थित केल्यामुळे बांधा निर्माण झाला. कंत्राटदार कोर्टात गेले आणि आमदार – नगराध्यक्ष निवांत आहेत.

---

गिरणी कर्जात बुडाली आहे. कामगारांना पुरेसा पगार नाही, महागाईभत्ता नाही व प्रॉव्हिडंट फंडही मिळत नाही. असे असताना गिरणीच्या खर्चाने मेजवान्या झोडल्या जाणे म्हणजे कामगारांचे रक्त पिणे होय." यानंतर भाऊसाहेबांच्या बेकायदेशीर कृत्यांचा तपशील देण्यात आला व शेवटी इषारा देण्यात आला— "यापुढे जर कोणी मंत्री लाखोपती भाऊसाहेबांच्या पापांवर पांघरूण घालण्यासाठी जयशंकर गिरणीत जेवायला आला तर त्याचा पूर्ण बंदोबस्त केला जाईल."

हे आव्हान स्वीकारण्यासाठी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री व सोलापूर जिल्ह्याचे संपर्क किंवा सांभाळमंत्री श्री. राजारामबापू पाटील ता. २६ जुलै १९७० रोजी बार्शीला आले. वास्तविक डोक्यावर लाल दिवा असलेली सरकारी मोटार सोबत होती, पण झाडबुकेंची मोटार मोठी व अलिशान असल्याने राजारामबापू तिच्यात बसले होते. निदर्शकांनी त्यांची मोटार अडवली. त्यांना निवेदन दिले. "या प्रकरणांची मला माहिती नाही, चौकशी करून कळवतो" असे म्हणाले आणि नंतर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मोर्चेवाल्यांवर यथेच्छ तोंडसुख घेऊन व भाऊसाहेबांची भलावण करून जयशंकरमध्ये मेजवानीला गेले.

पुढे डॉ. मंगूडकरांच्या एका नातेवाईकाच्या लग्नासाठी राजारामबापू आले आणि ६८ अधिकाऱ्यांचा मोटार-ताफा घेऊन भातंबरे या गावी गेले व तेथून बार्शीला येऊन जयशंकरमध्ये गेले. तेव्हा सोशलिस्ट पार्टीने चौकात बोर्ड लावला—

"मंत्र्यांनो, जा. जयशंकरमध्ये जा, आणि शेण खा." ◻

## प्रश्नचिन्ह

◻ ◻ ◻ ◻ ◻

श्री. भाऊसाहेब झाडबुके व श्रीमती प्रभाताई यांच्या कर्तृत्वशाली दशकाची ही कथा. लवकरच एक तप पूर्ण होईल म्हणा. या तपात त्यांनी काय मिळविले ?

एका जॉइंट स्टॉक कंपनीला पार दिवाळ्यात काढले.

एक सहकारी बँक दिवाळ्यात काढली.

| | | | |
|---|---|---|---|
| गोरगरीब गिरणीकामगारांचे सुमारे | | रु. २० | लाख |
| सरकारी वित्तसंस्थांचे | ,, | रु. ७ | ,, |
| सहकारी संस्थांचे | ,, | रु. २५ | ,, |
| बार्शी नगरपालिकेचे | ,, | रु. ४ | ,, |
| खाजगी व्यापाऱ्यांचे | ,, | रु. ५ | ,, |
| व्यापारी बँकांचे | ,, | रु. १५ | ,, |
| महाराष्ट्र सरकारचे | ,, | रु. ५ | ,, |
| शिक्षण संस्थांचे | ,, | रु. १ | ,, |

असे मिळून इतरांचे सुमारे रु. ८२ लाख त्यांनी बुडविले किंवा धोक्यात आणले. त्याची जबाबदारी आपल्यावर येणार नाही अशी सर्व कायदेशीर तरतूद केली. **आणि स्वतःला वंशपरंपरा उपभोगता येईल अशी सुमारे एक कोटीची मालमत्ता केली. अगदी कायद्याच्या चौकटीत बसेल अशी.**

मेहनत करणाऱ्याला आपल्या भविष्यनिर्वाह निधीचा नवा पैसासुद्धा मिळू नये, टाचा घासत मरायची पाळी यावी आणि सत्ताधारी पक्षात शिरून शिरजोर बनलेला धनिकशहा कोट्याधीश व्हावा — ही आहे भारतीय लोकशाहीची किमया. इतका उलटा न्याय जेथे चालतो त्याला अराजक म्हणायचे नाही तर कशाला? अन्यायाविरुद्ध चिडून उठलेल्या विद्यार्थ्यांनी व शेतमजुरांनी केलेल्या दगडफेकीला?


संसदीय लोकशाहीचे खानदानी पुरस्कर्ते म्हणतात, की 'देशात राज्यघटनेनुसार कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय आणि समता प्रस्थापित करणे हे राष्ट्राने स्वीकारलेले भव्योदात्त ध्येय आहे. ते साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने शांततेच्या व सनदशीर मार्गाने झटले पाहिजे....'

कबूल. त्याप्रमाणे बार्शी — परिसरातील राजकीय व आर्थिक अन्यायाविरूद्ध तेथील गिरणीकामगार, शेतकरी, शेतमजूर, तरुण विद्यार्थी व काही ध्येयवेडे कार्यकर्ते धडपडत आहेत. अर्ज विनंत्या, शांततामय मोर्चे — सत्याग्रह, नगरपालिकेत कायद्याला धरून विरोध— या मार्गांनी झगडत आहेत. पदरचे शेकडो रुपये पत्रव्यवहारावर खर्च करीत आहेत. रात्रंदिवस पायपीट करीत आहेत. पण कायद्याचे व घटनेचे रखवालदार काय करीत आहेत? बार्शी-सोलापुरातील अधिकारी बिचारे हतबल आहेत, कारण 'त्यांचे हात वरपर्यंत पोचलेले आहेत.' आणि वरचे काय करीत आहेत? '१९६५ च्या नगरपालिका कायद्यानुसार श्री. झाडबुके यांचे वर्तन बेकायदेशीर मानायला हवे, पण काय करणार? १९६३ चा, बार्शी नगरपालिकेचा एक ठराव त्यांचा बचाव करतो आहे. अशी मल्लिनाथी करण्यात सचिव-अवर सचिव एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. आणि लोकनियुक्त सत्ताधाऱ्यांना मनोमन वाटते आहे, की भाऊसाहेब-प्रभाताईंसारखी सज्जन माणसे दुनियेत शोधून सापडणार नाहीत. म्हणून त्यांना वाचवायला मंत्रि-उपमंत्री हे आपल्या मंत्रिपदाच्या शपथा मोडायला मागेपुढे पाहात नाहीत!

अशा स्थितीत आर्थिक, सामाजिक व राजकीय न्याय मिळविण्यासाठी आता कुठल्या मार्गांचा अवलंब करावा असा प्रश्न सर्वसाधारण नागरिकासमोर पडला आहे. १७८९ साली फ्रान्समधील माणसासमोरही असाच प्रश्न उभा राहिला होता का?

□ □ □

# थोर वारसा



तुमच्या कुटुंबियांना तुम्ही दिलेली प्रेमाची सुंदर भेट— 'एसीसी सिमेंटमध्ये बांधलेले घर. ते वर्षानुवर्षे, पिढ्या न् पिढ्या तुमच्या कुटुंबियांना आसरा, ऊब आणि आराम देत राहील.

तेव्हा आत्ताच विचार करा. काही वर्षांनी तुमच्याबद्दल त्यांना खचितच कृतज्ञता वाटेल.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **ए सी सी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २० यांचा संपर्क साधा.

तज्ञांची **मोफत** तांत्रिक मदत दि कॉंक्रीट ॲसोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**दि ॲसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**

**ACC**
**शेतकऱ्यांचा सखा**

CMI 1937(A)



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

यापुढील अंक, प्रजासत्ताकदिन विशेषांक म्हणून प्रसिद्ध होत आहे.
या विशेषांकाचे आणखी एक आकर्षण—

## सिंध-देश पुरवणी

या विशेषांकाची पृष्ठसंख्या अधिक असली (सुमारे शंभर) तरी किंमत नेहमीच्या अंकाची (पन्नास पैसे) राहील हे वाचकांनी-विक्रेत्यांनी कृपया ध्यानी घ्यावे.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

नवे प्रकाशन

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

प्रसिद्धी : २६ जानेवारी ७२

राजहंस प्रकाशन, पुणे